RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

अमरावती
१३ सोमवार एप्रिल २०२६
✲ वर्ष ५ ✲ अंक ३१७
✲ पृष्ठ : ६ ✲ मूल्य रु : ३

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

## गिलने कोहलीचा विक्रम मोडला



■ गुजरात टायटन्सने आयपीएल 2026 च्या 19व्या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सला 7 गडी राखून हरवले. इकाना क्रिकेट स्टेडियमवर रविवारी शुभमन गिलने विराट कोहलीचा विक्रम मोडला. तो 4000 धावा पूर्ण करणारा सर्वात तरुण भारतीय फलंदाज ठरला. सामन्यात आणखी एक मोठा विक्रम जोस बटलरच्या नावावर राहिला. त्याने 100वी टी-20 अर्धशतक पूर्ण केले आणि याच दरम्यान टी-20 क्रिकेटमध्ये 14 हजार धावांचा टप्पा पार केला.

# संगीत क्षेत्रातील एक अजरामर आवाज हरपला

## १२ हजारांहून अधिक गाणी, ७ वेळा फिल्मफेअर

**▸विदर्भ केसरी। मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संगीत विश्वातील एक युगांत घडवणारा, चैतन्यमय आणि सर्वांना भुरळ घालणारा आवाज आज कायमचा शांत झाला आहे. ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांचे आज १२ एप्रिल २०२६ रोजी मुंबईत निधन झाले. वयाच्या ९२ व्या त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आशा भोसले यांच्या निधनामुळे भारतीय चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. गेल्या काही दिवसांपासून आशा भोसले यांना प्रकृतीच्या तक्रारी जाणवत होत्या. त्यांना प्रचंड थकवा आणि छातीत संसर्गाचा त्रास होत होता. प्रकृती खालावल्यामुळे ११ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते. यानंतर रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला. यानतंर आता डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व अवयव निकामी (मल्टी ऑर्गन फेल्युअर) मुळे आशा भोसले यांचे निधन झाले. त्यांचे सुपुत्र आनंद भोसले यांनी ही दुर्दैवी बातमी दिली. माझी आई आशा भोसले यांचे निधन झाले आहे. उद्या दुपारी ४ वाजता दादर येथील शिवाजी पार्कात त्यांच्यावर शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात येतील. त्यापूर्वी त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी लोअर परळ येथील त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात येणार आहे, असे आनंद भोसले यांनी सांगितले. भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रतिभावान आणि अष्टपैलू पार्श्वगायिका म्हणून आशा भोसले यांना ओळखले जायचे. त्यांचे नाव सिनेसृष्टीत आदराने घेतले जाते. आठ दशकांच्या कारकिर्दीत केवळ मराठी किंवा हिंदीच नव्हे, तर बंगालीसह अनेक भारतीय भाषांमध्ये त्यांनी आपल्या आवाजाची जादू पसरवली. १२ हजारांहून अधिक गाणी त्यांनी गायली. त्यांनी संगीतप्रेमींच्या मनावर अधिराज्य गाजवले.

**▸विदर्भ केसरी। मुंबई :**

**भारतीय संगीत क्षेत्रातील एक अजरामर आवाज शांत झाला आहे. ९२ वर्षांच्या दिग्गज गायिका आशा भोसले यांचे आज मुंबईतील ब्रिच कँडी हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वात शोककळा पसरली असून, त्यांच्या चाहत्यांमध्ये दुःखाचे वातावरण निर्माण झाले आहे.**



११ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी आशा भोसले यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना मुंबईतील ब्रिच कँडी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. हृदयविकाराचा झटका, छातीतील संसर्ग आणि अतिशय थकवा या तीन प्रमुख कारणांमुळे त्यांना तातडीने उपचारासाठी आयसीयू विभागात हलवण्यात आले होते. डॉक्टरांनी त्यांच्यावर सतत लक्ष ठेवले होते आणि सर्वोत्तम उपचार सुरू होते. मात्र, उपचार चालू असताना त्यांचे निधन झाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आशा भोसले यांच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली होती. त्यांनी "Praying for her good health and a speedy recovery" असे म्हणत त्यांच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली होती. देशभरातील लोकांना आशा भोसले यांच्याशी असलेल्या भावनिक संबंधाचे दर्शन घडले.

संगीत क्षेत्रातील दिग्गज कलाकार, संगीतकार, गीतकार आणि लाखो चाहते यांनी आशा भोसले यांच्या आरोग्याबद्दल प्रार्थना केली होती. दरम्यान त्यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसंगीताला मोठी हानी पोहोचली आहे. आशा भोसले यांचा संगीतातील प्रवास हा भारतीय सिनेमा इतिहासातील एक स्वर्णकाळ मानला जातो. १९४० च्या दशकात बालकलाकार म्हणून सुरू झालेल्या त्यांच्या कारकिर्दीने पुढील सात दशकांमध्ये हजारो गाणी गाऊन संगीत रसिकांना मंत्रमुग्ध केले. आर. डी. बर्मन, एस. डी. बर्मन, ओ. पी. नय्यर यांसारख्या महान संगीतकारांसोबत त्यांनी दिलेल्या गाण्यांनी हिंदी, मराठी, अनेक भाषांमध्ये अमर ठसा उमटवला. 'कजरा मोहब्बत वाला', 'दम मारो दम', 'ये मेरा दिल', 'चुरा लिया है तुमने' सारखी गाणी आजही तरुण पिढीपर्यंत पोहोचली. आशा भोसले यांनी केवळ चित्रपट गाणीच नाही तर भजन, गजल, लोकगीते आणि आधुनिक गाणीही गाऊन आपल्या बहुमुखी प्रतिभेची साक्ष दिली. त्यांना पद्मविभूषण, पद्मभूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार, नॅशनल अवॉर्ड्स् असे अनेक मानसन्मान मिळाले. ९२ वर्षांच्या वयातही त्यांचा उत्साह आणि संगीताची आवड कायम होती. त्यांच्या निधनाने संगीत क्षेत्रात एक युग संपले आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी आणि चाहत्यांनी या दुःखाच्या क्षणी एकमेकांना आधार दिला आहे. आशा भोसले यांचा आवाज कधीही विसरला जाणार नाही. त्यांच्या अमर गाण्यांमधून त्यांचा आत्मा सदैव जिवंत राहील. संपूर्ण देश त्यांच्या आठवणींना श्रद्धांजली वाहत आहे.

### संघर्षातून यशाकडे (१९५०-१९६०)

■ सुरुवातीच्या काळात मोठ्या गायिकांकडे (उदा. लता मंगेशकर, गीता दत्त) उरलेली गाणी किंवा 'बी' ग्रेड चित्रपटांतील गाणी आशा ताईंच्या वाट्याला येत असत. ओ. पी. नय्यर यांनी आशा ताईंच्या आवाजातील वेगळेपण ओळखले. 'नया दौर' (१९५७) मधील 'मांग के साथ तुम्हारा' आणि 'उडे जब जब जुल्फें तेरी' या गाण्यांनी त्यांना मोठी लोकप्रियता मिळवून दिली. त्या काळात त्यांनी शास्त्रीय संगीत, कव्वाली आणि रोमँटिक गाण्यांमध्ये आपला ठसा उमटवला.

### दोन मिनिटांचे मौन पाळण्यात आले.

■ आशा भोसले यांच्या निधनाबद्दल आदरांजली वाहण्यासाठी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर दोन मिनिटांचे मौन पाळण्यात आले. मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूर यांच्यातील आयपीएल २०२६ च्या मोठ्या सामन्यापूर्वी ही आदरांजली वाहण्यात आली

### सुवर्णकाळ : आर. डी. बर्मन आणि 'पंचम' पर्व (१९७०-१९८०)

■ आर. डी. बर्मन (पंचमदा) आणि आशा भोसले यांच्या जोडीने भारतीय संगीतात क्रांती घडवली. पाश्चात्त्य संगीताचा प्रभाव : 'दम मारो दम' (हरे रामा हरे कृष्णा), 'पिया तू अब तो आजा' (कारवाँ) यांसारख्या गाण्यांमुळे त्यांना 'पॉप क्वीन' ही नवी ओळख मिळाली. 'उमराव जान' (१९८१) मधील गझल गाऊन त्यांनी सिद्ध केले की, त्या केवळ पॉपच नाही तर अत्यंत गंभीर आणि शास्त्रीय ढंगाची गाणीही लीलया गाऊ शकतात. या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

### प्रयोगशीलता आणि नवीन पिढीशी जुळवून घेणे (१९९०-आजतागायत)

■ वयाच्या साठीनंतरही आशा ताईंनी आपला आवाज तरुण ठेवला. रंगीला रे : १९९५ मध्ये ए. आर. रहमान यांच्या 'रंगीला' चित्रपटातील 'तनहा तनहा' आणि 'याई रे' गाण्यांनी त्यांनी नव्या पिढीलाही वेड लावले.इंडिपोप आणि जागतिक [illegible]हयोग : त्यांनी 'जानम समझा करो' सारखे पॉप अल्बम्स काढले आणि ब्रिटिश बँड 'कॉर्ड रेड' तसेच बॉब जॉर्ज यांसारख्या आंतरराष्ट्रीय कलाकारांसोबत काम केले.



### देवेंद्र फडणवीस यांनी आदरांजली वाहिली

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्मविभूषण आणि महाराष्ट्र भूषण आशा भोसले यांना अखेरचा निरोप देण्यासाठी आणि भावपूर्ण आदरांजली वाहण्यासाठी मुंबईतील त्यांच्या निवासस्थानी भेट दिली.

■ ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील एका सुवर्णयुगाचा अंत झाला असून, सुरांची 'सम्राज्ञी' काळाच्या पडद्याआड गेली आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, आशा भोसले यांच्या आवाजात विलक्षण माधुर्य, विविधता आणि भावनांची अप्रतिम अभिव्यक्ती होती. हिंदी, मराठीसह विविध भारतीय भाषांमधील हजारो गाण्यांमधून त्यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. 'पिया तू अब तो आजा', 'दम मारो दम', 'इन आंखों की मस्ती', 'चुरा लिया है तुमने' यांसारखी असंख्य गाणी आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. त्यांच्या गायकीत आधुनिकतेसोबतच पारंपरिकतेचा सुंदर संगम दिसून येतो.

### एका अष्टपैलू कारकीर्दीचा प्रवास

■ आशा भोसले यांनी केवळ मराठी आणि हिंदीच नव्हे, तर २० पेक्षा जास्त भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये १०,००० हून अधिक गाणी गायली आहेत. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी रोमँटिक गाणी, गझल, शास्त्रीय संगीत आणि 'दम मारो दम' सारखी पॉप गाणी गाऊन आपले अष्टपैलूत्व सिद्ध केले होते.

### बालपण आणि सुरुवातीचा संघर्ष (१९३३-१९४८)

■ आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगलीत झाला. वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून त्यांना गाण्याचा वारसा मिळाला. अवघ्या ९ व्या वर्षी वडिलांचे छत्र हरपले, ज्यामुळे कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर आणि लता दीदींवर आली. १९४३ मध्ये 'माझा बाळ' या मराठी चित्रपटातील 'चला चला नव बाळा' हे त्यांचे पहिले गाणे होते. १९४८ मध्ये 'चुनरिया' चित्रपटातील 'सावन आया' या गाण्याने त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

!! पाहिजेत !!

**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)

'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.

⏭ पात्रता आणि आवश्यकता:

पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.

**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.

■ शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर

■ आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.

■ एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.

इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.
संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९

## शिधापत्रिकाधारकांचे ३ लिटर रॉकेल कागदावरच !

**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

केंद्र सरकारने गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक शिधापत्रिकाधारकाला ३ लिटर रॉकेल देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, विदर्भात त्याची अंमलबजावणी केवळ कागदावरच राहण्याची चिन्हे आहे. अपुऱ्या यंत्रणा आणि सात जिल्ह्यांचा पुरवठा संशयास्पद पद्धतीने एका वितरकावर सोपविल्याने वितरण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रक्रियेवर विदर्भ केरोसिन डिलर्स असोसिएशनने आक्षेप नोंदविला आहे.

अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशातील काही भागात गॅस सिलिंडरचा तुटवडा आहे. त्यामुळे केंद्र सरकारने स्वस्त धान्य दुकानातून शिधापत्रिकाधारकांना प्रति कार्ड ३ लिटर रॉकेल देण्याचा निर्णय घेतला. मात्र, विदर्भात, रॉकेल वाटपात गंभीर अडचणी निर्माण होणार आहे. पूर्वी राज्यात निळ्या रॉकेलच्या वितरणाची सुसज्ज यंत्रणा होती.

पेट्रोलियम कंपन्यांनी जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर प्रतिनिधी नेमले होते. हे प्रतिनिधी पेट्रोलियम साठवण केंद्रातून रॉकेल उचलून घाऊक, अर्धघाऊक आणि किरकोळ परवानाधारकांना पुरवठा करत होते. संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी व तहसीलदारांकडून अधिकृत यादी दिली जात असे आणि निळ्या टँकरद्वारे घरपोच वितरणाची जबाबदारी प्रतिनिधींवर असे. मात्र, गेल्या काही वर्षांत रॉकेल पुरवठा पूर्णपणे बंद झाल्याने ही संपूर्ण यंत्रणा मोडकळीस आली. सध्या अनेक परवानाधारकांकडे रॉकेल साठवण्यासाठी आवश्यक पींपे उपलब्ध नाही. जरी साठवणूक व्यवस्था केली, तरी एका टँकरमधील रॉकेल विविध परवानाधारकांना २०, ५०, ७० किंवा २०० लिटर अशा लहान प्रमाणात वाटप करण्यासाठी आठवडा ते दहा दिवस लागतात. याशिवाय, रॉकेल वाहतुकीसाठी आवश्यक निळ्या रंगाचे टँकरही उपलब्ध नाही.

नवीन टँकर तयार केला, तरी महिन्याला केवळ ३ ते ४ टँकरचीच उचल शक्य होते, तर एका जिल्ह्याचा सरासरी कोटा ८ ते ९ टँकर इतका आहे. त्यामुळे एका वितरकाकडून संपूर्ण जिल्ह्याचा पुरवठा वेळेत करणे व्यवहार्य नाही. यासाठी किमान २ ते ३ टँकरची व्यवस्था आवश्यक आहे. मात्र, ही योजना केवळ २ ते ३ महिन्यांसाठी असल्याने कोणताही वितरक एवढी मोठी गुंतवणूक करण्यास तयार नाही.



अग्रलेख

# भेसळयुक्त

ही जेमतेम दीड महिन्यापूर्वीची घटना आहे. आंध्र प्रदेशातील गोदावरी जिल्ह्यातील लालाचेवरू, चौंदेश्वरनगर, स्वरूपनगर या भागांत गेल्या फेब्रुवारी महिन्यात अचानक काही लोकांना वेगळाच आजार सुरू झाला. मळमळ, उलट्या, पोटदुखीमुळे अनेक जण बेजार झाले. अनेकांना मूत्रविसर्जनदेखील करता येईनासे झाले. काहींची मूत्रपिंडे निकामी झाली आणि या आजाराने जिल्हा हादरून गेला. गेल्या 22 फेब्रुवारी रोजी अशा काही तक्रारी सुरू झाल्या आणि रुग्णांची संख्या वाढू लागल्याने तपास यंत्रणा सतर्क झाल्या. सखोल चौकशी सुरू झाली आणि आजाराचे मूळ शोधण्यासाठी आरोग्य यंत्रणा कामाला लागल्या. याच परिसरातील एका दूध डेअरीमधून विकले जाणारे दूध आहारात वापरले गेल्याने या तक्रारी सुरू झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष निघाला आणि या दुधाची तपासणी करण्यात आली.

पूर्णान्न आणि आरोग्यरक्षक मानल्या जाणाऱ्या दुधामुळे अनेक जण अक्षरशः मृत्युशय्येवर पडले. 20 हून अधिक लोकांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले. लहान मुले, वृद्ध, महिलांनाही या दुधाची बाधा झाली आणि 16 जण अक्षरशः तडफडून मरण पावले. एथिलिन गायकॉल नावाचा अँटी-फ्रिझ म्हणून वापरला जाणारा व मानवी आरोग्यासाठी अत्यंत अपायकारक असणारा विषारी पदार्थ दुधात मिसळला जात होता आणि या भेसळयुक्त दुधामुळे 16 जीव प्राणास मुकले, काही जण गंभीर आजाराशी कमालीचा संघर्ष करून कसाबसा तरले. 100 हून अधिक कुटुंबांच्या घरी त्या डेअरीमधून हे दूध वितरित केले जात होते. त्याचा आहारात वापर केलेल्या काहींना डायलिसिस द्यावे लागले, काही जणांची प्रकृती एवढी बिघडली की त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवावे लागले. या घटनेनंतर संपूर्ण देश हादरला. त्याआधी गेल्या वर्षी, जूनमध्ये उत्तर प्रदेशातील आग्रा येथे भेसळयुक्त दूध प्यायल्याने दोन निष्पाप बालकांचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आल्यावर प्रशासनाने आग्रा बाह्य रस्त्यावरच दुधाची वाहतूक करणारा एक टँकर जप्त केला आणि तब्बल पाच हजार लिटर भेसळयुक्त दूध रस्त्यावर ओतून दिले. असाच एक प्रकार गेल्या वर्षी मे महिन्यात महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात उघडकीस आला होता. सोलापूर जिल्ह्यातील एका गावातील शीतकरण केंद्रातून गाईचे दूध घेऊन कोल्हापूरकडे निघालेल्या पाच टँकरमध्ये भेसळयुक्त दूध असल्याची खात्रीशीर माहिती अन्न व औषध प्रशासनास मिळाली आणि वाटेतच टँकर अडवून दुधाची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये भेसळ असल्याचे निष्पन्न झाल्यावर पाचही टँकरमधील सुमारे 75 हजार लिटर दूध ओतून नष्ट करण्यात आले. जळगावच्या धरणगाव तालुक्यातील भवरखेडे येथे घातक रसायनांपासून बनविलेल्या दुधाची विक्री होत असल्याची खबर मिळाल्यावर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाèयांनी पोलिसांच्या मदतीने कारवाई करून बनावट दूध तयार करणाèया एका तरुणास अटक केली. गेल्या जुलै महिन्यातील या कारवाईत सुमारे 80 लिटर बनावट दूध नष्ट करण्यात आले, पण तोवर असे किती दूध विकले गेले असेल आणि किती जणांनी भेसळयुक्त दूध पूर्णान्न म्हणून आहारात वापरले असेल या भीतीने गाव गोठले असेल यात शंका नाही. जळगाव जिल्ह्यात अनेक ठिकाणी बनावट दूध तयार करण्याचा उद्योग चालत असल्याचे बोलले जाते. अनेक ठिकाणी खाजगी दूध संकलन केंद्रांतील दुधाचे नमुने तपासणीसाठी घेतल्यानंतर कारवायाही करण्यात आल्या होत्या.adulterated milk तरीही भेसळीचे आणि बनावट दुधाचे संकट सरल्याची खात्री नागरिकांना नाही. तेल, चुना, रसायने, शाम्पू, साबण, बोरिक ॲसिड, युरिया, स्टार्च, हायड्रोजन पॅराक्साईड यासारख्या आरोग्यास अपायकारक असलेल्या पदार्थांचा वापर करून बनावट दूध तयार करण्याचे कारखाने जागोजागी फोफावल्याच्या बातम्या गेल्या अनेक वर्षांपासून सतत कानावर आदळत असतात. आग्रा येथे दोन बालकांचा मृत्यू झाल्यावर पुन्हा एकदा त्या बातम्यांनी डोके वर काढले. यापैकी काही रसायने एवढी घातक असतात की त्यामुळे कर्करोगासारखे आजारही बळावू शकतात, शरीरातील पेशींचे नुकसान होते आणि आनुवंशिकतेच्या गुणात्मकतेलाही बाधा येऊ शकते, असे अनेक संशोधनांतून स्पष्ट झाले आहे. मात्र, अजूनही, दूध हे पूर्णान्न असल्याची सार्वत्रिक समजूत श्रद्धेने जोपासली जाते. भेसळयुक्त पदार्थ तयार करणे, ते बाजारपेठेत आणणे आणि ग्राहकाच्या माथी मारणे ही जीवघेणी अनैतिक व्यापारनीती केवळ दुधासारख्या एकाच पदार्थापुरती मर्यादित राहिलेली नाही. आरोग्यास पोषक मानल्या जाणाèया दुधापासून ते आरोग्यास अपायकारक असलेल्या दारूपर्यंत सर्वत्र भेसळीच्या धंद्याचा उच्छाद सुरू असल्याने, कोणत्याही वस्तूच्या नैसर्गिक शुद्धतेवर डोळे झाकून विश्वास ठेवावा अशी हमी देणे सामान्य समाजास अशक्य होऊ लागले आहे. दोन-चार दिवसांपूर्वी गुजरातमधील अहमदाबादेत चांदखेडा परिसरात एका कुटुंबाने तयार डोश्याचे पीठ विकत आणले. घरच्या घरी बनविलेला डोसा आरोग्यास चांगला असतो या विश्वासाने तो खाल्ल्यावर सर्वांना अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि अन्न विषबाधेची सारी लक्षणे दिसू लागली. उपचार सुरू झाले, पण कुटुंबातील दोन बालके मात्र हे विष पचवू शकली नाहीत. उपचार सुरू असतानाच त्यांनी प्राण सोडला. यातील एका बालिकेने जेमतेम काही महिन्यांपूर्वी जगात प्रवेश केला होता. उघड्या डोळ्यांनी जग पाहण्याआधीच तिला जगाचा निरोप घ्यावा लागला. तिच्या आईने डोसा खाल्ल्यानंतर स्तनपान दिल्याने तिचा मृत्यू झाला असावा असे सांगितले जाते. अन्नातील भेसळीचे हे अंगावर शहारे आणणारे जीवघेणे उदाहरण आहे. दोन-चार वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशातील मेरठमध्ये नवरात्रीचा उत्सव साजरा करताना भेसळयुक्त कुट्टू पिठाचे सेवन केल्याने सुमारे दीडशे जणांना विषबाधा झाली, तर हरयाणाच्या सोनीपतमध्ये तीन वर्षांपूर्वी गव्हाचे भेसळयुक्त पीठ खाल्ल्याने एक जण मरण पावला. अलिकडे तांदूळही नकली मिळत असल्याची भीती व्यक्त होत असते आणि अंड्यांच्या शुद्धतेवरही प्रश्नचिन्हे उमटत असतात. नकली मिठाने बाजारात शिरकाव केल्याच्या भीतीने अनेक जण धास्तावले आहेत. स्वयंपाकघरात वापरल्या जाणाèया लाल तिखट व हळदीमध्ये रासायनिक रंगाची भेसळ, काळेमिरीमध्ये पपईच्या वाळलेल्या बियांची भेसळ, दुग्धजन्य पदार्थांपासून बनविल्या जाणाèया मिठाईमध्ये मैदा वा अन्य रासायनिक पदार्थांची भेसळ, जीव वाचविण्यासाठी आणि आरोग्याच्या समस्यांपासून मुक्ती मिळविण्यासाठी घ्यावयाच्या औषधांमध्येही भेसळ आणि पिकांचे पोषण व्हावे यासाठी वापरल्या जाणाèया खतामध्येही भेसळ आढळू लागल्याने, जगाचे अवघे जगणे भेसळयुक्त होऊ लागले असून, ज्याचे सेवन जगण्यासाठी करावे त्यापैकी काहीही मरणास कारणीभूत ठरू शकते या भीतीचे वास्तविक रूप आता दिसू लागले आहे.

# महारूद्र मारोती मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात संपन्न.

## लेकी-बाळींच्या सन्मानाने अवघ्या गावाची मायेने भरली ओटी. ह.भ.प. शिवदास महाराज बारब्दे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सोहळ्याची सांगता.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**

येथील ग्रामस्थांच्या एकजुटीतून आणि श्रद्धेतून साकारलेल्या श्री महारूद्र मारोती मंदिराचा जीर्णोद्धार व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा अत्यंत मंगलमय वातावरणात पार पडला. भक्तिमय वातावरणाने संपूर्ण गाव न्हाऊन निघाले असून, यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी परिसराचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शास्त्रोक्त पद्धतीने वेदमंत्रांच्या जयघोषात मारोती रायाच्या नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यानिमित्ताने मंदिरात अभिषेक, होमहवन आणि महापूजा असे विविध धार्मिक विधी पार पडले. संपूर्ण मंदिर परिसराची आकर्षक फुलांनी आणि विद्युत रोषणाईने सजावट करण्यात आली होती.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे 'गावच्या लेकींचा सन्मान'. ग्रामीण संस्कृतीत लेकीला लक्ष्मीचे रूप मानले जाते. याच भावनेतून गावातील सर्व विवाहित लेकी-बाळींना बोलावून त्यांना 'साळी-चोळी' आणि मानाचा आहेर देऊन सन्मानित करण्यात आले. आपल्या माहेरी झालेला हा आगळावेगळा सन्मान पाहून अनेक लेकींचे डोळे पाणावले होते.

मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी आणि देखण्या बांधकामासाठी ज्या मान्यवरांनी सढळ हाताने मदत केली, तसेच ज्यांचे विशेष सहकार्य लाभले, अशा सर्व देणगीदारांचा आणि कार्यकर्त्यांचा मंदिर समितीच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. "लोकसहभागातूनच हे भव्य मंदिर उभे राहू शकले," अशी भावना यावेळी आयोजकांनी व्यक्त केली. काल्याच्या कीर्तनाने सांगता सप्ताहाची आणि सोहळ्याची सांगता प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. शिवदास महाराज बारब्दे. यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. "भक्ती आणि शक्तीचा संगम म्हणजे मारोती राय आहेत," असे निरूपण महाराजांनी आपल्या रसाळ वाणीतून केले. कीर्तनानंतर उपस्थित हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. पंचक्रोशीतून जनसागर उसळला या कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत नेटके करण्यात आले होते.

मंदिर समितीने पंचक्रोशीतील प्रत्येक गावोगावी जाऊन प्रत्यक्ष निमंत्रण दिले होते. त्यामुळे आजूबाजूच्या गावांतून मोठ्या संख्येने भाविक या सोहळ्यासाठी दाखल झाले होते. जय श्रीराम आणि बजरंग बलीच्या जयघोषाने कमळखेड परिसर दुमदुमून गेला होता.या कार्यक्रमास सहकार्य शरद कांबे,पंकज कांबे,सौरभ कांबे,अरूण वसू,चेतन कांबे, गोपाल कांबे,दिपक गणेशपूरे,पिंटू कांबे, संजय कांबे,राजू बांबल,व समस्त गावकरी मंडळी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम संपन्न झाला.



# विजेच्या धक्क्याने युवकाचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी। दारव्हा,**

घराच्या बांधकामादरम्यान विजेच्या धक्क्याने युवकाचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील मुंडळ (हादगाव) येथे शनिवार, ११ एप्रिल रोजी रात्री ८.३० च्या सुमारास घडली.



युग झोलेश धादोड (वय १७, मुंडळ हादगाव) असे मृत युवकाचे नाव आहे. त्याने नुकतीच शिवाजी सायन्स कॉलेज येथून ११ वीची परीक्षा दिली होती.

महाविद्यालयात हुशार, प्रेमळ, प्रामाणिक विद्यार्थी म्हणून त्याचा नावलौकिक असून त्याचे वडील प्रगतीशील शेतकरी आहेत. घराचे बांधकाम सुरू असताना शनिवार, ११ एप्रिलला रात्री त्याला अचानक विजेचा जबर धक्का बसला. त्याला वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात उपचारार्थ भरती करण्यात आले होते. मात्र डॉक्टरांच्या शर्थीच्या प्रयत्नानंतरही त्याची प्राणज्योत मालवली. या घटनेने गावात हळहळ असून तरुण गेल्याने धादोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# सामाजिक समता सप्ताहानिमित्त इसापूर येथे नेत्रदान शिबिर उत्साहात

**▸विदर्भ केसरी। राजहंस शेंडे**

कुही (जि. नागपूर) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सामाजिक समता सप्ताहाचे औचित्य साधत ग्रामपंचायत इसापूर (नवे) येथे नेत्रदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे आणि मैत्रेय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन




करून करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन आमदार संजयजी मेश्राम (उमरेड) यांच्या हस्ते झाले. यावेळी बार्टीच्या वतीने त्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच राधिनी गोंडणे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रमोद घरडे उपस्थित होते. तसेच मैत्रेय फाउंडेशनचे अध्यक्ष मिलिंद चाहांदे, सचिव रत्नमाला हिरापुरे, बार्टीचे समतादूत अल्ताफ कुरेशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अल्ताफ कुरेशी यांनी बार्टीच्या विविध योजनांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना निखिल डोंगरे यांनी मांडली, तर मान्यवरांचे स्वागत मंजुषा मडके यांनी केले. आभार प्रदर्शन प्रार्थना दिवे यांनी केले. नेत्र तपासणी शिबिराला गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद देत लाभ घेतला. सामाजिक समतेचा संदेश देत आरोग्यसेवेचा लाभ गावपातळीवर उपलब्ध करून देणारा हा उपक्रम विशेष ठरला.

# पुसदमध्ये 'साईबाबा बँजो'वर पोलिसांची कारवाई

**▸विदर्भ केसरी। पुसद**

महात्मा फुले जयंतीनिमित्त आयोजित शोभायात्रेत डीजीच्या धर्तीवर कर्णकर्कश आवाज करून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या 'साईबाबा बँजो'वर पुसद शहर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. प्रशासनाचे स्पष्ट आदेश असतानाही नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी बँजोचे साहित्य आणि वाहन जप्त (डिटेन) केले आहे. या कारवाईमुळे अनधिकृतपणे मोठ्या आवाजात वाद्य वाजवणाऱ्या चालकांचे धाबे दणाणले आहेत.

पोलीस स्टेशन पुसद शहरचे ठाणेदार सेवानंद वानखडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी. जे. यांनी




वेळोवेळी बैठका घेऊन आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून ध्वनी प्रदूषण टाळण्याचे आवाहन केले होते. मात्र, ११ एप्रिल रोजी मिरवणुकीदरम्यान नरेश खंडागळे यांच्या मालकीच्या साईबाबा बँजो अनसिंग यांनी वाहनावर डीजेचे मोठे बॉक्स लावून लोकांच्या आरोग्यास त्रास होईल अशा रीतीने आवाजाची मर्यादा ओलांडली होती. हृदयविकाराचे झटके, बहिरेपणा आणि मानवी आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेऊन पोलिसांनी ही कारवाई केली. सदर कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी. जे. यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सार्वजनिक उत्सवांमध्ये शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच ध्वनी प्रदूषण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. भविष्यातही अशाच प्रकारे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर पावले उचलली जातील, असा इशारा पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी दिला आहे.

# महाकाव्य करंडक स्पर्धेत कवी सुभाष मानवटकर प्रथम

**▸विदर्भ केसरी। सतीश भालेराव**

**नागपूर :-** प्रज्ञा बहूउद्दशीय संस्था महाराष्ट्र द्वारा आयोजित १४ वे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन श्यामसुंदर गावकर मुंबई, यांच्या अध्यक्षतेखाली धनवटे सभागृह नागपूर येथे पार पडले. या प्रसंगी किशोर कुमार मिश्रा शेगाव, संजय पवार छ. संभाजी नगर, अंजली डोळे पुणे, स्नेहा सुभेदार पुणे व दीपक करगुंटकर मुंबई प्रामुख्याने उपस्थितीत होते. या संमेलना अंतर्गत भव्य महाकाव्य करंडक स्पर्धेचे आयोजन दीपक करगुंटकर मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रभरातील दिग्गज कवींनी सहभाग नोंदवला असून या स्पर्धेचे परीक्षण डॉ. राजा धर्माधिकारी, परतवाडा अमरावती व डॉ. यशवंत मस्के गंगाखेड यांनी केले. सुत्र संचालन अजित उबाळे यांनी केले होते. या स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे मानकरी वानाडोंगरी येथील सुप्रसिद्ध कवी सुभाष मानवटकर उर्फ निळं पाखरु ठरले तर द्वितीय क्रमांक सचिन टांगळे सोलापूर व डॉ. साधना काळबांडे अकोट यांना मिळाला असून तिसरा क्रमांक रेखा सोनारे नागपूर व डॉ. राज यावलीकर अमरावती यांनी पटकविला. याप्रसंगी पुरस्कार म्हणून पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम प्रथम पुरस्कार २००० रुपये रोख संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष लीनाताई देगलुरकर यांनी स्व हस्ते मिठाई भरवून विजेत्यांचे अभिनंदन केले.




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

# वाळू तस्करीचा कहर; प्रशासनाची चुप्पी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ प्रतिनिधी**

**घाटंजी - कुऱ्हाड- डांगरगाव घाट परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. दिवस-रात्र सुरू असलेल्या या तस्करीकडे संबंधित प्रशासन जाणीवपूर्वक डोळेझाक करीत असल्याचा गंभीर आरोप स्थानिकांकडून होत आहे.**



सूत्रांच्या माहितीनुसार, दररोज रात्री तसेच दिवसा देखील १० ते १५ ट्रॅक्टरच्या माध्यमातून वाळूचा उपसा करून ती बाहेर नेली जाते. या सततच्या अवजड वाहतुकीमुळे गावकऱ्यांचे जगणे त्रस्त झाले असून, रात्रीच्या वेळी ट्रॅक्टरच्या कर्कश आवाजामुळे नागरिकांची झोप उडत आहे. दिवसभर उडणाऱ्या धुळीमुळे लहान मुले आणि वृद्धांमध्ये श्वसनाचे आजार वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिकांनी असा आरोप केला आहे की, या अवैध व्यवसायामागे काही प्रभावशाली घटकांचा हात असून, त्यांच्या संगनमतानेच प्रशासनाकडून कारवाई होत नाही. त्यामुळे शासनाच्या महसुलाला मोठा फटका बसत असतानाही संबंधित यंत्रणा निष्क्रिय राहिल्याचे दिसून येत आहे.

याच परिसरात काही दिवसांपूर्वी एका ट्रॅक्टरच्या चाकाखाली एक लहान मुलगा सापडल्याची माहिती समोर आली आहे. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असली तरी अशा घटना वारंवार घडत असल्याचे सांगितले जाते. मात्र, भीतीपोटी स्थानिक नागरिक उघडपणे तक्रार करण्यास टाळाटाळ करीत आहेत. पर्यावरणाच्या दृष्टीनेही ही परिस्थिती धोकादायक ठरत आहे. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वाळू उपशामुळे नदीपात्राची रचना बदलत असून, येणाऱ्या पावसाळ्यात पाणी जमिनीत न मुरता वाहून जाण्याची शक्यता आहे. परिणामी शेतीवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

## कायदा काय सांगतो?

■ वाळू उत्खननासाठी शासनाची परवानगी आवश्यक असून, पर्यावरणीय नियमांचे पालन बंधनकारक आहे. अवैध उत्खनन, वाहतूक व साठा करणे हा दंडनीय गुन्हा असून संबंधितांवर कठोर कारवाईची तरतूद आहे.

## प्रशासनाला सवाल

■ सततच्या तक्रारी, वाढता त्रास आणि संभाव्य अपघात यांनंतरही कारवाई का होत नाही? संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद का वाटते? महसुलाचे नुकसान आणि नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असताना जबाबदार यंत्रणा नेमकी काय करत आहे? स्थानिक नागरिकांनी तातडीने कठोर कारवाई करून वाळू तस्करी थांबवावी, अशी जोरदार मागणी केली आहे.



## ३ दुचाकी चक्काचूर, ३ जण गंभीर जखमी

**▸विदर्भ केसरी। सोनगीर :**

रविवारी (दि.१२) दुपारी २ वाजेच्या सुमारास सोनगीर फाट्यावर काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली. शिरपूरकडून धुळ्याच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या रसायन भरलेल्या युपी पार्सिंग असलेल्या टँकरच्या चालकाचा ताबा सुटल्याने भीषण अपघात झाला. नियंत्रण सुटलेल्या टँकरने उड्डाणपुलाखालील वाहने आणि दुकाने चिरडून मोठे नुकसान झाले आहे.

पुलाखालील शीतपेय विक्री केंद्राला टँकरने जोरदार धडक दिली. तिथेच उभा असलेला मका भरलेला ट्रॅक्टर ट्रॉलीलाही टँकरने जोरदार धडक दिली. या घटनेमुळे परिसरात थरकाप वाढला आहे. एकूण ४ दुचाकी आणि १ कार अशा ६ वाहनांना या टँकरने चिरडले. या भीषण धडकेत ३ दुचाकी टँकरखाली आल्याने त्यांचा चक्काचूर झाला. ट्रॅक्टर, कार आणि दुचाकीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, या अपघातात ३ जण गंभीर जखमी असून त्यांना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच सोनगीर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक ठाकरे आणि बागुल यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली.

## महत्त्वाचे



### महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर।**

तालुक्यातील बावनबीर येथे ग्रामपंचायत कार्यालयात शनिवारी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित छोटेखानी कार्यक्रमास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यावेळी ग्रामपंचायतचे सरपंच/प्रशासक गजानन मनसुटे यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक कार्याचा व शिक्षण प्रसारातील योगदानाचा स्मरण करून कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमास ग्रामपंचायत लिपिक शैलेश शिरसाट, सागर निवणे, विजय काळपांडे, निलेश हागे, विशाल मुरुख, विजय सोळंके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



### महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ प्रतिनिधी**

यवतमाळ येथे लहुजी शक्ती सेना जिल्हा यवतमाळ तसेच आधारस्तंभ फाउंडेशन यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक क्रांतीचे अग्रदूत राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांची 199 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम 11 एप्रिल 2026 रोजी पळसवाडी कॅम्प येथील शाखेच्या नामफलकाजवळ पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात महामानवांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन करून करण्यात आली. यावेळी भुराजी तायडे यांनी महात्मा फुलेंच्या जीवनकार्यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी समाजातील बहुजनांच्या शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले आणि लहुजी वस्ताद साळवे यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख करत त्यांच्या कार्याची महती सांगितली. कार्यक्रमात ज्येष्ठ सल्लागार ज्ञानेश्वरजी खंडारे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदेश संघटक राजाभाऊ इंगोले होते. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सागर भाऊ झोंबाडे, आधारस्तंभ फाउंडेशनच्या संस्थापिका पल्लवीताई इंगोले, जयाताई तायडे, अमोल पडघन, जीवन वाघमारे, प्रफुल्ल गवळी, संतोष ससाने तसेच लहुजी शक्ती सेनेचे पदाधिकारी व अनेक सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाद्वारे महात्मा फुले यांच्या विचारांचे स्मरण करून समाजात शिक्षण व समतेचा संदेश देण्यात आला.

# ज्ञानेश्वर भिसडे यांना नाशिक येथे आदर्श शेतकरी कृषी गौरव पुरस्कार 2026 प्रदान

**▸विदर्भ केसरी। रिसोड :-**

रिसोड तालुक्यातील मौजे. कोयाळी ( बु ) येथील आदर्श शेतकरी, बिनविरोध तथा तंटामुक्ती अध्यक्ष नेहमीच समाजसेवेत स्वतःला वाहून घेऊन सक्रिय असणारे वारकरी परंपरेने वाटचाल करत आज श्री.ज्ञानेश्वर भिसडे यांना आज नाशिक येथे 10 एप्रिल रोजी जय किसान फार्मर्स फोरम व आमची माती आमची माणसं यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे पाहिले कृषीमंत्री कृषी अभ्यासक बहुजन समाजाचे पुढारी कृषीरत्न डॉ. पंजाबराव देशमुख उपाख्य भाऊसाहेब यांच्या स्मृतिदिना निमित्त दि. १० एप्रिल २०२६ ला सकाळी ११ वाजता नाट्यगृह, सार्व. वाचनालय, नेहरू गार्डन हॉल मध्ये अनेक नामांकित मान्यवरांच्या हस्ते श्री. ज्ञानेश्वर आत्माराम भिसडे व त्यांच्या सपतनिक यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषी गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमा पूजन दीपप्रज्वलनाने तसेच स्वागत गीताने कार्यक्रमास सुरुवात झाली, अध्यक्ष श्री.आबा मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमास सुरुवात झाली,आपली माती आपली माणसं संपादक श्री. संजय जी जाधव सर यांनी प्रस्तावना केली, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. आबासाहेब मोरे ( श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, दिंडोरी ) यांनी उपस्थित महाराष्ट्रातील सर्व शेतकरी बांधवाना सेंद्रिय शेती करून विषमुक्त शेती करावी असे सांगितले, सोबतच जमिनीची पोषकता वाढवावी, शेणखताचा वापर करावा, अशा महत्वाच्या विषयावर प्रभोधन केले, व उत्कृष्ट शेती करणाऱ्या महाराष्ट्रातील मोजक्याच शेतकरी बांधवाना हा सन्मान मिळाला आहे, वाशिम जिल्हामधून मालेगाव तालुक्यातील श्री.संदीप विश्वनाथ टोचर रा. राजुरा. ता. मालेगाव तर रिसोड तालुक्यातील श्री. ज्ञानेश्वर भिसडे या दोन रत्नांना हा पुरस्कार मिळाला आहे, संजय लाड सर ( सातारा ) यांचे वेळोवेळी मार्गदर्शन घडले म्हणूनच आज मी ह्या पुरस्काराचा मानकरी ठरलो असे ज्ञानेश्वर भिसडे म्हणाले, तसेच या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मा. ॲड. नितीन ठाकरे(सरचिटणीस, मराठा विद्याप्रसारक समाज संस्था) मा. उद्धवजी आहेर(चेअरमन, आनंद ॲग्रो ग्रुप)मा. डॉ. जयराम पुरकर (जेष्ठ कृषी शास्त्रज्ञ)मा. रमेश पाटील (संचालक, आनंद ॲग्रो) मा. पंढरीनाथ थोरे (मा. अध्यक्ष, जि. प. नाशिक) मा. अर्जुन तोखणे (संशोधक, गावखेती योजना) मा. डॉ. संतोष जाधव (राष्ट्रीय सेवा प्रमुख विविध भारती) मा. सदुभाऊ शेळके (सेंद्रिय शेतीतज्ञ) मा. पांडुरंग चव्हाण (ज्येष्ठ उद्योजक) यांची प्रमुख उपस्थिती लाभली, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमा पूजन दीपप्रज्वलनाने,स्वागत गीताने, तसेच शेतकरी गीताने कार्यक्रमास सुरुवात झाली, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायिका शुभदा महाजन, व मोहन कुमार निकम यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला सुंदर अशा गायनाने वातावरण समृद्ध आनंदमय केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.तुषार वाघुळदे यांनी केले, या सोहळ्यात शेतकऱ्यांचा सन्मान करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



# कार चालकावर जीवघेणा हल्ला, तिघांना बेड्या

**▸विदर्भ केसरी। डोंबिवली :**

रस्त्यात गाडी उभी करण्याच्या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर रक्तरंजित संघर्षात झाल्याची धक्कादायक घटना डोंबिवलीत घडली आहे. केवळ बाजूला होण्यास सांगितल्याचा राग मनात धरून तिघांनी मिळून कार चालक आणि त्याच्या मित्रावर दगडानी प्राणघातक हल्ला केला. याप्रकरणी विष्णूनगर पोलिसांनी तातडीने हालचाली करत तिन्ही आरोपींना अटक केली आहे

डोंबिवली पश्चिमेकडील सत्यवान चौक परिसरात ही घटना घडली. कार चालक अमित पाटील हे आपल्या कारने जात असताना रस्त्यात गाडी उभी करून गप्पा मारणाऱ्या तिघांना त्यांनी गाडी बाजूला घेण्याची विनंती केली. मात्र, समोरच्या तरुणांनी त्याकडे दुर्लक्ष केले. अमित यांनी दोन-तीन वेळा हॉर्न वाजवताच या तरुणांचा पारा चढला.

संतापाच्या भरात या तिघांनी अमित पाटील आणि त्यांचा मित्र यश म्हात्रे यांच्यावर हल्ला चढवला. रस्त्यावरील दगड उचलून त्यांना बेदम मारहाण करण्यात आली आणि कारचीही मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली. या हल्ल्यात अमित आणि यश दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच विष्णूनगर पोलिसांनी तपास चक्रे फिरवून प्रितेश उर्फ राम्या म्हात्रे, सचिन म्हात्रे आणि योगेश सुर्वे या तिघांना वेगवेगळ्या ठिकाणांहून अटक केली. अटक करण्यात आलेल्यांपैकी राम्या म्हात्रे आणि सचिन म्हात्रे हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वीही गंभीर गुन्हे दाखल आहेत. परिसरात त्यांची मोठी दहशत असल्याचे समजते.

# “गावातच मिळणार सरकारी सेवा!”

## – कुही तहसीलचा धडाकेबाज उपक्रम; मांढळ येथे महसूल शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**▸विदर्भ केसरी। राजहंस शेंडे**



कुही (जि. नागपूर) : “सरकारी कामासाठी आता तहसील कार्यालयाच्या फेऱ्या नाहीत!” — कुही तहसील प्रशासनाने सुरू केलेल्या महसूल शिबिर अभियानामुळे ही घोषणा आता प्रत्यक्षात उतरू लागली आहे. ‘प्रशासन आपल्या दारी’ या संकल्पनेला मूर्त रूप देत गावागावात थेट महसूल शिबिरे भरवून ‘वन डे सर्विस डिलिव्हरी’द्वारे नागरिकांना एका दिवसात सेवा देण्याचा प्रभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत १० एप्रिल रोजी मांढळ येथे आयोजित महसूल शिबिराला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळपासूनच नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. कुही तालुक्यातील विविध गावांमधून आलेल्या नागरिकांनी सातबारा दुरुस्ती, वारस नोंद, फेरफार, प्रलंबित प्रकरणे यांसंदर्भात अर्ज सादर केले. प्रशासनाने तक्रारी ऐकून अनेक प्रकरणांचा जागेवरच निपटारा करत नागरिकांना मोठा दिलासा दिला. या शिबिरांमध्ये सातबारा (7/12) उताऱ्यातील दुरुस्ती, नोंदी अद्ययावत करणे, वारस नोंद, फेरफार, जमीन मोजणीसंबंधित सेवा तसेच विविध प्रकारची प्रमाणपत्रे देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून जलद, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा देण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. तहसील कुही अंतर्गत सिल्ली, वेलतूर, पचखेडी, मांढळ, राजोला, तितूर आणि कुही या ठिकाणी टप्प्याटप्प्याने शिबिरे आयोजित करण्यात आली असून, या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना थेट गावातच सेवा मिळत आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रमांची मोठ्या प्रमाणात बचत होत असून, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी नायब तहसीलदार बुद्धभूषण निकाळजे, तलाठी मोहन पवार तसेच कृषी अधिकारी राजेश जारोंडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कुही तहसीलच्या या लोकाभिमुख उपक्रमामुळे ग्रामीण भागात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडूनही या निर्णयाचे मोठ्या प्रमाणावर स्वागत होत आहे. आता खऱ्या अर्थाने “एकाच दिवसात, आपल्या गावात” सरकारी सेवा उपलब्ध होत असल्याने प्रशासनाविषयीचा विश्वास अधिक दृढ होत आहे.

# गोंडपिपरीत तहसीलदार 'ॲक्शन मोड'मध्ये

## कारवाईच्या धसक्याने भरारी पथक सक्रिय, अवैध वाळूचा ट्रक जेरबंद!

**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड**



गों डपिपरी तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि तस्करीने उच्छाद मांडला असतानाच, तहसीलदार शुभम बाहकर यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेचा सकारात्मक परिणाम आता जमिनीवर दिसू लागला आहे. कर्तव्यात कसूर करणाऱ्या ९ कर्मचाऱ्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावल्यानंतर, प्रशासकीय यंत्रणा खडबडून जागी झाली असून आज रात्रीच्या सुमारास फिरत्या पथकाने अवैध वाळू वाहतूक करणारा एक मोठा 'हायवा' ट्रक पकडून तहसील कार्यालयात जमा केला. तालुक्यात रेती आणि मुरूम तस्करी रो खण्यासाठी नेमलेली भरारी पथके के वळ कागदावरच असल्याचे चित्र गेल्या काही दिवसांपासून होते. १० ए प्रिल रोजी तर भरारी पथकातील कर्मचारी नियुक्त ठिकाणी फिरकलेच नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले होते. यावर कठोर कारवाई करत तहसीलदारांनी नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि महसूल सेवक अशा ९ जणांना दणका दिला होता. या 'डॅशिंग' कारवाईचा असा परिणाम झाला की, सुस्त पडलेले फिरते पथक आता सक्रिय झाले आहे.

आज रात्रीच्या सुमारास नायब त हसीलदार चांदेकर साहेब यांच्या नेतृत्वाखालील फिरत्या पथकाने परिसरात गस्त घालत असताना, अवैध रित्या वाळू भरून वेगाने जाणाऱ्या एका हायवा ट्रकला अडवले. आवश्यक कागदपत्रे नसल्याने सदर ट्रक जप्त करून तहसील कार्यालयाच्या आवारात उभा करण्यात आला आहे. या कारवाईमुळे माफियांच्या गोटात एकच खळबळ उडाली आहे.

**■ 'घरचा भेदी' कोण? जनतेमध्ये चर्चांना उधाण**

एकीकडे प्रशासन कारवाईसाठी स रसावले असले, तरी दुसरीकडे एक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. महसूल विभागातीलच काही 'विभीषण' रेती आणि मुरूम माफियांच्या संपर्कात असल्याची चर्चा तालुक्यात रंगत आहे. पथक कारवाईसाठी निघण्यापूर्वीच त्याची माहिती माफियांपर्यंत पोहोचवली जाते, ज्यामुळे अनेकदा माफिया पसार होण्यात यशस्वी होतात. "जर प्रशासनातीलच काही व्यक्ती माफियांचे हित जोपासत असतील, तर कारवाईला मर्यादा येतात. त्यामुळे प्रशासनाने आता या 'घरच्या भेदी'चा शोध घेणे गरजेचे आहे," अशी भावना सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे. तहसीलदारांच्या या 'ॲक्शन मोड'चे स्वागत होत असले, तरी ही कारवाई केवळ काही दिवसांपुरती मर्यादित न राहता ती सातत्यपूर्ण असावी, अशी मागणी होत आहे. तालुक्यातील नैसर्गिक संपत्तीची लूट थांबवण्यासाठी प्रशासनाने अंतर्गत गद्दारी रोखून तस्करांवर कठोर जरब बसवणे आता काळाची गरज बनली आहे.

# बहुजनांच्या उन्नतीसाठी महात्मा फुले यांचे विचार प्रेरणादायक :– प्राप्ती मारोटकर

## प्रकाश मारोटकर मित्र परिवारातर्फे महात्मा फुले जयंती साजरी

**▸विदर्भ केसरी। अमोल धवसे**




नांदगाव खंडेश्वर महात्मा जोतिबा फुले हे भारतातील लोकशाही क्रांतीचे अग्रदूत असून बहुजनांच्या उन्नतीसाठी महात्मा फुले यांचे विचार प्रेरणादायी असल्याचे मत नगराध्यक्ष सौ.प्राप्ती मारोटकर यांनी व्यक्त केले.महात्मा फुले जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन प्रकाश मारोटकर मित्र परिवार व शिवाई उत्सव समितीने केले होते. शहरातील स्थानिक शिवाई चौकात अभिवादन कार्यक्रमात नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर तसेच सामाजिक कार्यकर्ते रामदासजी परसणकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

सामाजिक न्याय समता आणि शिक्षणाचा दीप प्रज्वलित करणारे महानसमाज सुधारक महात्मा जोतिबा फुले यांनी मांडलेले व्यक्ती स्वातंत्र्य आणि समतेचे विचार भारतीय राज्यघटनेत समाविष्ट झाले आहेत त्यांनी मांडलेल्या सामाजिक समतेच्या विचारांचे प्रतिबिंब संविधानाच्या मूलभूत हक्क आणि उद्देशिकेमध्ये दिसून येते असेही प्राप्ती मारोटकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी न.पं.उपनगराध्यक्ष अब्दुल जमिर न प सभापती वासुदेव लोखंडे, कांताबाई लोमटे, शिलाबाई वाडेकर, गटनेते प्रकाश मारोटकर अमोलधवसे, राहुल गुल्हाने रवी ठाकूर निलेश इखार, ज्ञानेश्वर मुके कमलेश मारोटकर गजानन चवाळे, ज्ञानेश्वर मारोटकर, गजानन कोळमकर, रंगरावजी गावंडे अनिल मरोटकर कान्तेश्वर लोमटे बाळू सोळंके उपस्थित होते.

या अभिवादन सोहळ्याचे आयोजन शिवाई उत्सव समिती व प्रकाश मारोटकर मित्र परिवाराचे अमन मानकर सुमित लोमटे अनिकेत गटुले सूरज लोमटे समित देशमुख हिमांशु तोटे कृष्णा सपकाळ विक्की मारोटकर हिमांशू गजबे भावेश इंगोले जय राऊत करण नेमाडे सिधू तायडे ऋषिकेश चांदूरकर प्रतीक मुके कार्तिक सोनोने मयूर लोखंडे गोकुळ हिवराळे राम चौधरी प्रेम हिवराळे इत्यदिनी केले होते

# निकृष्ट रस्त्याविरोधात उपोषणाचा इशारा

**▸विदर्भ केसरी। | प्रतिनिधी प्रेमदास तायडे**



अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विहीगाव येथे निकृष्ट दर्जाच्या रस्त्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून या प्रश्नाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार फिरोज कुरेशी यांनी अमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. अंजनगाव ते दर्यापूर मार्गावरील विहीगावकडे जाणारा सुमारे एक किलोमीटरचा रस्ता अत्यंत खराब झाला असून ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना, विशेषतः रुग्ण, गर्भवती महिला, शाळकरी विद्यार्थी व वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार अपघाताच्या घटना घडत असल्याने हा रस्ता नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे.

या संदर्भात फिरोज कुरेशी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, अंजनगाव सुर्जी तसेच दर्यापूर उपविभाग कार्यालयाकडे अनेक वेळा लेखी तक्रारी केल्या. मात्र संबंधित अधिकारी व अभियंत्यांनी या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असली तरी तीही निकृष्ट दर्जाची असल्याचे त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर फिरोज कुरेशी, भगवान अभ्यंकर व अन्य चार नागरिकांनी 13 एप्रिल 2026 रोजी सकाळी 9 वाजता अमरण उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे निवेदन तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच स्थानिक खासदार आणि आमदारांना देण्यात आले आहे. रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने करून संपूर्ण डांबरीकरण करण्यात यावे, तसेच निकृष्ट कामाची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. उपोषणादरम्यान कोणतीही जीवितहानी झाल्यास त्यास संबंधित विभागाचे अधिकारी जबाबदार राहतील, असा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, नागरिकांनी प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा व उपोषण टाळावे, अशी मागणी केली आहे.

## तांदूळ व्यवहारात २० लाखांचा गंडा

▸विदर्भ केसरी।

नागपूरातील घाऊक व्यापाऱ्याला कमी दरात तांदूळ पुरवण्याचे आमिष दाखवून चंद्रपूर जिल्ह्यातील पाच जणांनी सुमारे २० लाखांची फसवणूक केली. पियुष दिवाण या व्यापाऱ्याने करारानुसार जवळपास १९.९२ लाख रुपये अदा केले; मात्र माल न देता आरोपींनी टाळाटाळ केली. वारंवार पाठपुरावा करूनही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून, पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

महत्त्वाचे



## महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव सोहळा. उत्सव समितीने राबविले विविध उपक्रम

▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी :अमोल धवसे

नांदगाव खंडेश्वर तालुका प्रतिनिधी.महात्मा ज्योतिबा फुले आयोजन समितीचे अध्यक्ष माजी नगराध्यक्ष अक्षय पारसकर व जयंती उत्सव समितीच्या वतीने घेण्यात आलेला महात्मा ज्योतिबा फुले उत्सव सोहळा माळीपुरा येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात ह भ प श्यामसुंदर महाराज सोन्नर यांचे समाज प्रबोधन पर किर्तन घेण्यात आले. तसेच तालुक्यातील शासकीय सेवेत निवड होऊन विविध विभागात रुजू झालेले विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांनी पूजन केले. यावेळी महात्मा ज्योतिबा फुले उत्सव समितीचे अध्यक्ष माजी नगराध्यक्ष अक्षय पारसकर, नगराध्यक्ष प्राप्तीताई मारोटकर,रावसाहेब रोठे, विठ्ठलराव चांदणे,उमेश महाराज जाधव, चंद्रशेखर महाराज वैद्य, देविदासजी सुने,माजी नगराध्यक्ष संजय पोफळे, नगरपंचायत गटनेते प्रकाश मारोटकर, आयोजक अभिषेक पारसकर व मित्रपरिवार, योगेश चवाळे, अविनाश ब्राह्मणवाडे, ओंकार ठाकरे, वासुदेवराव लोखंडे,रंजीत खंडाळकर, राजेश पाठक, डॉ. भूषण पोतदार, नितीन टाले, अमोल धवसे, निलेश इखार, गजानन डोक, उमेश सोनोने, अजय चांदणे, दीपक काळेकर, अशोक दैत,अरुण लहाबर, किशोर शिरभाते, म. इद्रीस, सुयश कटके, सुरेश काकडे, गजानन नागोलकर, श्याम शिंदे, राहुल गुल्हाने, नारायणराव डोक, सुभाष मंगळे, प्रदीप जोशी, प्रदीप काळेकर, गजानन मारोटकर, नरेंद्र लहाबर, अमोल ढंगारे, सुधाकर मारोटकर, सुनील बिटले, अजय लाड, राजीव डोक, अनिल मंगळे, सचिन चहाकार, आशाताई पारसकर, कांताबाई लोमटे, शीलाताई वाडेकर, रेखाताई मारोटकर, विजयाताई लायबर, मंगला जेवडे, वनमलाताई खडसे, रेवती परसनकर, आरती तरेकर,चित्राताई गतपणे व महात्मा ज्योतिबा फुले आयोजन समितीची सर्व मंडळी

## विजेच्या धक्क्याने युवकाचा मृत्यू

▸विदर्भ केसरी। दारव्हा प्रतिनिधी



दारव्हा : तालुक्यातील मुंडळ (हादगाव) येथे घराच्या सुरू असलेल्या बांधकामादरम्यान विजेचा धक्का लागून एका युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (११ एप्रिल) सायंकाळी सुमारे ८.३० वाजताच्या सुमारास घडली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे. युग झोलेश धादोड (वय १७, रा. मुंडळ-हादगाव) असे मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे. त्याने नुकतीच दारव्हा येथील शिवाजी सायन्स कॉलेजमधून इयत्ता ११ वी विज्ञान शाखेची परीक्षा दिली होती. महाविद्यालयात तो हुशार, शांत, प्रेमळ, नम्र व प्रामाणिक विद्यार्थी म्हणून ओळखला जात होता. त्याचे वडील प्रगतशील शेतकरी आहेत. घराचे बांधकाम सुरू असताना शनिवारी सायंकाळी सुमारे ८.३० वाजताच्या दरम्यान त्याला अचानक विजेचा जबर धक्का बसला. घटनेनंतर त्याला तातडीने उपचारासाठी वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी केलेल्या शर्थीच्या प्रयत्नांनंतरही उपचारांना प्रतिसाद न मिळाल्याने त्याची प्राणज्योत मालवली. या दुर्दैवी घटनेमुळे मुंडळ गावात शोककळा पसरली असून तरुण मुलाच्या निधनामुळे धादोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.घटनेची माहिती मिळताच दारव्हा पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला होता. तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. रविवारी मुंडळ येथील मोक्षधामात त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## जुगाराच्या नादात तरुण 'सोनसाखळी चोर

▸विदर्भ केसरी।

ऑनलाईन जुगाराच्या व्यसनामुळे कर्जाच्या खाईत लोटल्या गेलेल्या एका तरुणाने थेट चोरीचा मार्ग स्वीकारल्याची धक्कादायक घटना तहसील परिसरात उघडकीस आली. अमित रामदास उईके (३०) असे आरोपीचे नाव असून, त्याने घरात विश्रांती घेत असलेल्या ६६ वर्षीय महिलेच्या गळ्यातील दोन तोळ्यांची सोनसाखळी हिसकावली. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी त्याला अटक केली. चौकशीत त्याने जुगारात गमावलेल्या पैशांमुळे कर्जबाजारी झाल्याने चोरी केल्याची कबुली दिली. चोरीची साखळी त्याने गहाण ठेवल्याचेही समोर आले.

# ३८ वर्षांपूर्वी आशा भोसले यांना मिळाली होती अमरावती विद्यापीठाची डी. लिट

▸विदर्भ केसरी। अमरावती:




ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी रविवारी मुंबई येथील रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. आपल्या जादुई आवाजाने सगळ्या जगाला भुरळ घालणाऱ्या आशा भोसले या काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने सुमारे ३८ वर्षांपूर्वी त्यांना डी. लिट ही मानद उपाधीने सन्मानित केले होते. त्यावेळच्या आठवणी आता जाग्या झाल्या आहेत.

अमरावती विद्यापीठाची स्थापना १ मे १९८३ रोजी झाली. सुरूवातीच्या काळात विद्यापीठाचे कामकाज त्यावेळच्या विदर्भ महाविद्यालयाच्या परिसरात चालत होते. ज्येष्ठ नेते माजी विधान परिषद सदस्य प्रा. बी.टी. देशमुख, माजी आमदार डॉ. देविसिंह शेखावत, प्राचार्य डॅडी देशमुख हे विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर होते. डॅडी देशमुख यांचे चित्रपट सृष्टीशी आणि मंगेशकर कुटुंबीयांशी संबंध होते. आशा भोसले यांना डी.लिट देऊन त्यांचा सन्मान करण्याचा प्रस्ताव डॅडी देशमुख यांनी मांडला होता. त्याला सर्वच सदस्यांनी पाठिंबा दिला होता. आशा भोसले यांनला ही उपाधी अमरावती विद्यापीठाच्या तिसऱ्या दीक्षांत सोहळ्यात अमरावती विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. के.जी. देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली होती, अशी माहिती अमरावती विद्यापीठाचे माजी जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर फुले यांनी दिली.

### काय म्हणाल्या होत्या आशा भोसले?

■ सन्मान स्वीकारण्यासाठी आशा भोसले या अमरावतीला आल्या होत्या. विदर्भ महाविद्यालयाच्या प्रांगणातच दीक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आशा भोसले म्हणाल्या होत्या, वऱ्हाड आणि अमरावतीने मंगेशकर कुटुंबीयांना नेहमीच साथ दिली आहे. माझे वडील दीनानाथ मंगेशकर यांचे अनेक कार्यक्रम अमरावती शहरात होत होते. अमरावतीकर प्रेक्षकांनी सातत्याने मदत केली, असे माझी आई नेहमीच सांगत होती. मी जास्त शिकलेली नसतानाही अमरावती विद्यापीठाने माझा सन्मान केला, सर्वांची मी ऋणी आहे. डॉ. किशोर फुले यांनी या कार्यक्रमातील आठवणींना उजाळा दिला.

### सुरेश भट यांच्याशी ऋणानुबंध

■ कविवर्य सुरेश भट हे मूळचे अमरावतीचे. त्यांच्या अनेक गीतांना आशा भोसले यांनी स्वरसाज चढवला. 'तरूण आहे रात्र अजुनी, राजसा निजलास का रे' हे गीत तर अत्यंत गाजलेले. हे गीत पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीतबद्ध केलेले. भावगीत प्रकारातील हे गाणे अत्यंत लोकप्रिय ठरले. आशा भोसले यांच्या कर्णमधुर आवाजात ते ऐकणे हा विलक्षण अनुभव ठरत असतो

# गोवंश हाडांच्या अवैध तस्करीचा पर्दाफाश.

## साडेपाच लाखांच्या मुद्देमालासह तिघांवर गुन्हा दाखल.

▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर




मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत दर्यापूर नाक्यावर गोवंश हाडांच्या अवैध वाहतुकीचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. पोलिसांनी या कारवाईत एका बोलेरो पिकअपसह मोठ्या प्रमाणात हाडे जप्त केली असून, याप्रकरणी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.गुप्त माहितीवरून नाकाबंदी* पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ एप्रिल २०२६ रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास कारंजाकडून दर्यापूरच्या दिशेने गोवंश हाडांची अवैध वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारावर दर्यापूर नाक्यावर तातडीने नाकाबंदी करण्यात आली. यादरम्यान संशयास्पद वाटणाऱ्या बोलेरो पिकअप वाहनाला (क्र. MH 27 DT 1324) थांबवून त्याची झडती घेण्यात आली. लाखोंचा मुद्देमाल जप्त वाहनाची तपासणी केली असता, मागील भागात सुमारे २,२९० किलो गोवंश प्राण्यांची हाडे आढळून आली. या हाडांची अंदाजे किंमत ३४,३५० रुपये असून, ५ लाख रुपये किमतीचे बोलेरो वाहन असा एकूण ५,३४,३५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या या वाहतुकीबाबत कोणताही वैध परवाना किंवा कागदपत्रे नसल्याने पोलिसांनी पंचनामा करून तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. आरोपींची नावे खालीलप्रमाणे आहेत:
१. बशीर खान अजीज खान (५०, रा. केसर कॉलनी, संभाजीनगर)
२. मोहम्मद इर्शाद मोहम्मद इक्बाल*(२२, रा. खोलापूर, दर्यापूर)
३. अब्दुल हकीम अब्दुल अजीज(२९, रा. खोलापूर, अमरावती)
या आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम ३२५, २८१, ३(५) आणि महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारणा २०१५) च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रकरणाचा पुढील तपास एएसआय गजानन थाटे करत असून, हेड कॉन्स्टेबल मेश्राम यांनी दाखला अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळली.

# कठडेविरहित विहिरीचा सापळा ठरला जीवघेणा

▸विदर्भ केसरी। गोंदिया:

निसर्गाच्या कुशीत मुक्त संचार करणाऱ्या वनराजालाच मानवी दुर्लक्षाचा बळी जावे लागल्याची हृदयद्रावक घटना नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर परिसरात उघडकीस आली आहे. तिरोडा वनपरिक्षेत्रातील माल्ही बिट अंतर्गत कोडेलोहारा परिसरात एका शेतातील कठडे नसलेल्या विहिरीत पडून सुमारे ४ ते ५ वर्षे वयाच्या वाघाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज रविवार सकाळी १० वाजताच्या सुमारास उघडकीस आली.

या घटनेने वन्यजीव संवर्धनाच्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, ग्रामीण भागातील उघड्या विहिरींच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, कोडेलोहारा येथील शेतकरी रुपचंद इसन कावळे यांच्या शेतातील विहिरीत वाघ पडल्याची माहिती मिळताच नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे जलद बचाव पथक आणि भंडारा वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

नवेगाव नागझिराचे उपसंचालक प्रितमसिंग कोडापे, सहायक वनसंरक्षक विजय धांडे, कु. मनिषा चव्हाण, तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी रविकमल भगत आणि कु. टेंभरे यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. प्राथमिक तपासात असे समोर आले की, वाघ हा शिकार करताना एखाद्या भक्ष्याचा पाठलाग करत असताना अचानकपणे कठडे नसलेल्या विहिरीत पडला असावा. या विहिरीची उघडी रचना आणि सुरक्षिततेचा अभाव हा या दुर्घटनेचा मुख्य कारणीभूत घटक ठरत असल्याचे वनाधिकाऱ्यांचे मत आहे.

# "धर्म माणसाला जोडण्यासाठी आहे, विभाजनासाठी नाही" : प्रा. जावेद पाशा

▸विदर्भ केसरी। विजय निखाते




पुसद : क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले जयंतीनिमित्त पुसद येथे आयोजित प्रबोधनपर व्याख्यानात नागपूर येथील प्रा. जावेद पाशा कुरेशी यांनी सामाजिक समता, धर्म, शिक्षण आणि राजकीय जागरूकतेवर प्रभावी व अभ्यासपूर्ण भाष्य केले. महात्मा फुले जयंती उत्सव समिती, पुसद यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम शुक्रवारी (दि. १० एप्रिल २०२६) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. प्रा. कुरेशी यांनी आपल्या भाषणात ठामपणे सांगितले की, "धर्म माणसाला जोडण्यासाठी आहे, विभाजनासाठी नाही" आणि "सांस्कृतिक संघर्ष हा मानवते च्या मानगुटीवर बसलेला राक्षस आहे". त्यांनी स्पष्ट केले की, धर्माचा मूळ उद्देश मानवतेची जपणूक असला तरी आज धर्माच्या नावाने समाजात तणाव निर्माण केला जात आहे. "हजारांमध्ये फारच कमी लोकांना धर्म समजतो, बाकी समाजजीवन जगतात," असे सांगत त्यांनी धर्माच्या नावाने होणाऱ्या दिशाभूल करणाऱ्या प्रवृत्तीवर टीका केली. ते पुढे म्हणाले की, "शिक्षण हाच खरा धर्म आहे, अन्यथा धर्म टिकू शकत नाही" हा महात्मा ज्योतिराव फुले यांचा मूलभूत विचार आजही तितकाच लागू आहे. फुले यांनी 'सत्यशोधक' विचार मांडत समाजात समता आणि बंधुतेचा मार्ग दिला. "सत्यशोधक विचार समाजात समता आणि बंधुता निर्माण करणारा मार्ग आहे," असे त्यांनी अधोरेखित केले. प्रा. कुरेशी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा उल्लेख करत सांगितले की, "सावित्रीबाईंच्या नैतिक पाठबळामुळेच ज्योतिबांची क्रांती यशस्वी झाली". त्यांनी फातिमा शेख यांचाही उल्लेख करत स्त्रीशिक्षणाच्या चळवळीतील त्यांच्या भूमिकेचे महत्त्व पटवून दिले. "स्त्रीशिक्षणामुळे समाजात मोठा बदल घडला, आजही त्याची गरज आहे," असे ते म्हणाले. राजकारणाच्या संदर्भात त्यांनी स्पष्ट शब्दांत मांडणी केली की, "राजकारण तुमच्या आयुष्याच्या प्रत्येक गोष्टीची किंमत ठरवणारी मोठी संस्था आहे". त्यामुळे नागरिकांनी राजकीयदृष्ट्या सजग राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाचा उल्लेख करत सांगितले की, "शिवरायांचा इतिहास जनतेपर्यंत पोहोचवणारे महात्मा ज्योतिराव फुले होते". तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फुले यांच्या विचारांना पुढे नेत संविधानाच्या माध्यमातून सामाजिक न्यायाची दिशा दिली. "फुले ते आंबेडकर विचारसरणी हीच सामाजिक न्यायाची खरी दिशा आहे," असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. उद्घाटन नगराध्यक्ष सौ. मोहिनीताई नाईक यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी आत्माराम जाधव होते. प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक सौ. विशाखा समीर गवळी उपस्थित होत्या. मंचावर प्रा. दिनकर गुल्हाने, बांधकाम सभापती अभिजीत पानपट्टे, पाणीपुरवठा सभापती राजेश साळुंखे, नगरसेवक ऋषिकेश पंडितकर, आरोग्य सभापती मजहर पठाण, संभाजी ब्रिगेडचे सुधीर देशमुख, माजी नगरसेवक साकिब शाह, सामाजिक कार्यकर्ते विष्णू गुद्दटवार तसेच उत्सव समितीचे अध्यक्ष समीर गवळी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती वाट यांनी केले तर आभार प्रदर्शन जाधव सर यांनी मानले. या व्याख्यानामुळे उपस्थितांमध्ये सामाजिक जागृती निर्माण झाली असून महात्मा फुले यांच्या विचारांची प्रासंगिकता अधोरेखित झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. महात्मा फुले जयंती उत्सव समिती अध्यक्ष समीर शिवाजीराव गवळी, कार्याध्यक्ष नानाभाऊ घाटे, सचिव ओमकार सोनटक्के, सहसचिव वैभव गवळी, उपाध्यक्ष उमाकांत सोनटक्के, राजूभाऊ मोरे (अरेगाव), कोषाध्यक्ष सौरभ विश्वनाथ मोरे, रॅली व शोभायात्रा प्रमुख राज गिऱ्हे, आकाश गवळी, ओम गवळी, सुमित दळवे, समीर मोरे, संघटक देविदास झरकार (पार्डी), निमंत्रक लक्ष्मणराव आगासे, प्रसिद्धी प्रमुख मारोती भस्मे, प्रकाश लामने, मार्गदर्शक आत्माराम जाधव, बुद्धरत्न भालेराव, मुरलीधर जाधव, गणेश मोरे, डॉ. रोहित राऊत, प्रशांत गिऱ्हे, मनोज गवळी, डॉ. गणेश गवळी तसेच महिला प्रतिनिधी सौ. सीमा सुनील गिऱ्हे, सौ. विशाखा समीर गवळी, देवानंद जांबुतकर, सुशांत कदम, प्रशांत गिऱ्हे, श्रावण मोरे, आकाश गवळी, इंद्रजित जाधव, निरंजन घाटे, किशोर जाधव, शंकर गिऱ्हे, विवेकानंद गवळी, विवेक बैस्कर, दीपक घाटुळ यांच्यासह अनेक समाजबांधव यांनी कार्यक्रमाच्या आयोजन नियोजन मध्ये अथक परिश्रम करून यशस्वीरित्या पार पाडला


# वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयाचा अजब-गजब कारभार

## जिल्हा खनीकर्म अधिकारी राठोड यांनी दिली अवैध उत्खननाची परवानगी : "उल्टा चोर कोतवाल डांटे

▸विदर्भ केसरी। कारंजा.

कारंजा तहसीलदार यांनी मौजे खानापूर येथील गट नंबर १३१ मध्ये अभिनव विजयकुमार अग्रवाल याचे अवैद्य उत्खनन थांबवून व त्याबाबत ईटीएस द्वारे मोजणी करण्याचे पत्र जिल्हा खानीकर्म अधिकारी यांना दिल्यानंतरही जिल्हा खनीकर्म अधिकारी विनय पि.राठोड यांनी त्याच १३१ गट क्रमांकावर व त्याच जागेवर तहसील कार्यालयामध्ये प्रकरण न्याय प्रविष्ट असताना व या विषयाची सर्व माहिती असताना मुरूम तस्कराशी हात मिळवणी करून पुन्हा २१०० ब्रास अवैद्य मुरूम उत्खनन करण्याची परवानगी दिली. हा सर्व प्रकार मा.जिल्हाधिकारी साहेब यांना माहीत नसेल का ? कारण परवानगी पत्रावर त्यांची स्वाक्षरी आहे.आणि आता अतिरिक्त मुरूम उत्खननाचे मोजमाप कसे होईल. असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सविस्तर माहिती अशी की मौजे खानापूर येथे गट क्रमांक १३१ वर अभिनव विजय कुमार अग्रवाल रा. मुर्तीजापुर यांनी अवैद्य उत्खनन केल्याची तक्रार अंकूश कडू यांनी दिनांक २१/१/२०२६ रोजी मा. तहसीलदार कारंजा यांच्याकडे केली होती. त्यावर तहसीलदार कारंजा यांनी मंडलाधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्या मार्फत प्रत्यक्ष मोक्यावर स्थळ निरीक्षण अहवाल दि.२२/१/२६ रोजी मागितला त्या अहवालामध्ये,संदर्भ क्र.२ नुसार मंडळ अधिकारी, खेर्डा बु.व ग्राम महसूल अधिकारी खानापूर यांचा अहवाल प्राप्त असून,मौजे खानापूर ता.कारंजा येथील शेत गट नं.१३१ एकुण क्षेत्रफळ ७.३५ हे.आर. जमीनीपैकी३.२४ हे.आर. जमीन अभिनव विजय अग्रवाल यांचे मालकीची असून,सदर जमीनीमध्ये मा. जिल्हाधिकारी,वाशिम यांचे आदेश क्र. MNL-३७/ खानापूर/०४/२०२५-२६ नुसार.०.५० हे.आर.जमीन क्षेत्रामधील २१०० ब्रास मुरुमाची दिनांक २९/१२/ २०२५ ते ३१/०१/२०२६ पर्यंत गौण खनिज उत्खनन करण्याकरीता परवानगी देण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष मोक्यावर स्थळ निरिक्षण केले असता,सदर शेताच्या उत्तर-पश्चिम भागात अंदाजे ९०×६० व खोली अंदाजे ४ मीटर उत्खनन केलेले दिसून आले.सदर खदान मालक यांनी आज पर्यंत ४१०० ब्रास गौण खनिज



उत्खनन बद्दल स्वामित्व धनाचा भरणा केलेला आहे,परंतु प्रत्यक्षात त्यांनी जास्त उत्खनन केल्याचे दिसून येते. तरी उपरोक्त उत्खनन बाबत तांत्रिक विभागाकडून मोजणी करुन त्यांनी किती उत्खनन केले हे निश्चित करता येईल असे मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी त्यांचे अहवालामध्ये नमुद केले आहे.तरी आपणास मौजे खानापूर ता.कारंजा येथील शेत गट नं.१३१ मधील क्षेत्रफळ ७.३५ हे.आर. जमीनीपैकी ३.२४ हे.आर. या क्षेत्राची ई.टी.एस द्वारे मोजणी करुन मिळावी ही असे पत्र दि.९/३/२६ रोजी माननीय तहसीलदार कारंजा यांनीच जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना पाठविले,एवढे असून सुद्धा जिल्हा खनिकर्म अधिकारी विनय राठोड यांनी दि.२३/३/२६ रोजी अभिनव विजय कुमार अग्रवाल याला त्याच गट नंबर वर व त्याच जागेवर २१०० ब्रास मुरूम उत्खननाची परवानगी दिली.या सर्व प्रकरणाची तक्रार पुन्हा दि.७/४/२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आणि हा सर्व प्रकार जिल्हाधिकारी साहेब यांच्या लक्षात आणून दिला,तेव्हा जिल्हा खनिकर्म अधिकारी राठोड यांनी पुन्हा उपविभागीय अधिकारी कारंजा यांना पत्र दिले, आपण तक्रार अर्जातील मुद्द्यानुसार सविस्तर चौकशी व नियमानुसार कारवाई करावी हे तर असे झाले की,"उल्टा चोर कोतवाल को डांटे"

# संविधान विचार मंचा तर्फे महारक्तदान शिबिराचे आयोजन

## विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त 135 बॅग रक्त संकलनाचा संकल्प

▸विदर्भ केसरी। यवतमाळ




डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त स्थानिक यवतमाळ येथील संविधान चौक येथे महारक्तदान शिबिराचे आयोजन संविधान विचार मंच यवतमाळ तर्फे करण्यात आले आहे. दरवर्षी या रक्तदान शिबिरात मोठ्या प्रमाणात स्त्री-पुरुष,युवक-युवती स्वेच्छेने रक्तदान करून बाबासाहेबांना कृतिशील अभिवादन करतात.संविधान विचार मंचातर्फे दरवर्षी वर्षातून दोनदा महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. सद्य परिस्थितीत शासकीय रक्तपेढी येथे रक्ताचा प्रचंड तुटवडा आहे. प्रसूती रुग्णांसह इतर अन्य रुग्णांना मोठ्या प्रमाणावर रक्ताची गरज भासत असते. या रक्तदानातून निश्चितच अनेकांना जीवनदान मिळणार आहे.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सदर रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त संख्येने रक्तदान करून बाबासाहेबांना कृतिशील अभिवादन करण्याचे आवाहन संविधान विचार मंचा तर्फे करण्यात आले आहे. सदर रक्तपुरवठा नेहमीप्रमाणे शासकीय रक्तपेढीस करण्यात येणार आहे.

» Selected

## जि.काँ. कार्यालयात क्रांतीसूर्य म. ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी



देसाईगंज : गडचिरोली जिल्हा काँग्रेस कार्यालयात महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष जिल्हा काँग्रेस कमिटी गडचिरोली महेंद्र ब्राह्मणवाडे, नगरसेवक तथा शहर अध्यक्ष काँग्रेस कमिटी गडचिरोली सतीश विधाते, अखिल भारतीय आदिवासी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव कुसुमताई आलाम, जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव सालोटकर, काशिनाथ भडके, जिल्हाध्यक्ष सहकार विभाग अब्दुलभाई पंजवानी, परिवहन विभाग रुपेश टिकले, हरबाजी मोरे, तालुका अध्यक्ष महिला काँग्रेस कल्पनाताई नंदेश्वर, कविता उराडे, उत्तम ठाकरे, निकेश कामिडवार, गौरव येणप्रेड्डीवार सह इतर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या शिक्षण, समता आणि बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची आठवण करून देत त्यांच्या विचारांचा समाजात प्रसार करण्याची गरज व्यक्त केली.

---

## श्री कन्याका माता मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा



देसाईगंज - दि. १२ एप्रिल २०२६ रोजी श्री कन्याका माता मंदिर, गडचिरोली येथे आयोजित भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त, या पावन प्रसंगी माजी मंत्री तथा बल्लारपूर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार मा.श्री. सुधिरभाऊ मुनगंटीवार यांचे गडचिरोलीत आगमन झाले. त्यांच्या आगमनावेळी शासकीय विश्रामगृह कॉम्प्लेक्स, गडचिरोली येथे माजी खासदार तथा भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोक नेते यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. यावेळी ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष बाबुरावजी कोहळे उपस्थिती होती.

---

## म. ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली



देसाईगंज - दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी देसाईगंज येथे आमदार श्री रामदास मसराम यांच्या जनसंपर्क कार्यालयात, महान समाजसुधारक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आमदार श्री रामदासजी मसराम यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्या समाजहिताच्या कार्याचा गौरव करत, त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. त्या प्रसंगी उपस्थित माजी सभापती परसरामजी टिकले, काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष देसाईगंज राजेंद्र बुल्ले, नगरसेवक राजूभाऊ रासेकर, काँग्रेस कमिटी आरमोरी विधानसभा अध्यक्ष कमलेश बारस्कर, काँग्रेस कमिटी ओबीसी सेल तालुकाध्यक्ष कैलास वानखेडे, NSUI तालुकाध्यक्ष देसाईगंज वैभव गोलाईत, युवा नेते प्रशांत अंकमवार, सागर बन्सोड, उपस्थित होते.

# विदर्भातील कमाल तापमानात वाढ!

## उत्तर मध्य महाराष्ट्रातील कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली

विदर्भ केसरी । मुंबई




राज्यात सध्या कोरडे हवामान असून काही ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरणाची नोंद होत आहे. मागील काही दिवसांच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात वाढ झाली असून यामुळे तीव्र उन्हाचा तडाखा नागरिकांना सहन करावा लागत आहेत. उत्तर मध्य महाराष्ट्रातील कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली असून विदर्भ आणि मराठवाड्यातही उन्हाची काहिली वाढली आहे. वायव्य भारतावर समुद्रसपाटीपासून १२.२ किलोमीटर वर उष्णतेचा पट्टा तयार झाला आहे. तसेच १५ एप्रिल रोजी हिमालय प्रदेशात पुन्हा तीव्र पश्चिमी विक्षोभाची स्थिती निर्माण होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यात सध्या अनेक भागातील कमाल तापमानात वाढ झाली असून यामुळे उन्हाळा अधिक तीव्र होत आहे. मागील काही दिवस पावसाळी हवामान असल्याने कमाल तापमानात आणि किमान तापमानातही काहीशी घट झाली होती यामुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला होता. मात्र, उकाड्यात वाढ झाल्याने नागरिकांच्या समस्यांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. पुढील पाच दिवसांत कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. नुकताच मुंबईसह कोकण पट्ट्यातील काही भागात उष्ण आणि दमट वातावरणाची नोंद झाली होती.

पुढील काही दिवस उत्तर मध्य महाराष्ट्र आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील काही भागात उष्ण आणि दमट वातावरण राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला असून सोमवारी सोलापूर आणि सांगली आदी भागांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.रविवारी विदर्भातील बहुतांश भागातील कमाल तापमान सरासरीहून २ अंश सेल्सिअसने अधिक नोंदले गेले. यात अकोला येथे सर्वाधिक म्हणजे ४३.१ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले जे सरासरीहुन २.४ अंशांनी तर शनिवारच्या कमाल तापमानाहुन १.१ अंशांनी अधिक होते. तर अमरावती ४२.४, चंद्रपूर ४१, गडचिरोली ४१, वर्धा ४२ आणि वाशीम येथील कमाल तापमान ४१.६ अंश सेल्सिअस इतके नोंदले गेले. मराठवाड्यात परभणी ४१,७ तर छत्रपती संभाजीनगर ४०.४ इतके कमाल तापमान नोंदले गेले. मध्य महाराष्ट्रातही जळगाव, मालेगाव, सांगली, सोलापूर आणि जेऊर येथील पारा ४१ अंशावर पोहोचला. तर कोकण प्रदेशात सरासरी कमाल तापमानाहून २ ते ३ अंश अधिक कमाल तापमान नोंदले जात आहे. डहाणू येथे या प्रदेशातील सर्वाधिक म्हणजे ३६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.त्तर मध्य महाराष्ट्रातील कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली असून विदर्भ आणि मराठवाड्यातही उन्हाची काहिली वाढली आहे. वायव्य भारतावर समुद्रसपाटीपासून १२.२ किलोमीटर वर उष्णतेचा पट्टा तयार झाला आहे.

# पोलिस दलात निवड झालेल्या मुलींचा भाकपा कडून सत्कार


विदर्भ केसरी । देसाईगंज

ब्रम्हपुरी तालुक्यातील मौजा आवळगाव, हळदा येथील पोलिस दलात निवड झालेल्या मुलींचा रविवारी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे वतीने सत्कार करण्यात आला. हळदा येथील कुमारी प्राची श्रीराम नरुले, योगिता दादाजी बावणे आणि आवळगाव येथील कुमारी शिवानी भास्कर गुरनुले या तीन मुलींची नुकतीच चंद्रपूर पोलिस दलात निवड झाली. निवड झालेल्या या मुलींचा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे लढाऊ नेते जिल्हा सहसचिव कॉ. विनोद झोडगे पाटील यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत या ध्येयवेड्या गरीब कुटुंबातील मुलींनी यशाला गवसणी घालून समाजापुढे आदर्श निर्माण केला. त्यांच्या या यशातून स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन यश प्राप्त करावे असे आवाहन कॉम्रेड विनोद झोडगे यांनी केले.तसेच या तिन्ही जिद्दी मुलींना पुढील वाटचालीच्या शुभेच्या देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी माजी सरपंच नरेश नखाते, शरद ठाकरे, संजय लोणारे, तंटामुक्ती अध्यक्ष लुमदेव खेवले, केशव बानबले,कैलास राऊत, सुरेश नखाते, मुखरु झोडगे, पत्रू मेश्राम, सूरेश पाटील ठाकरे, यादव मुलकर, यशवंत राऊत, धनराज उरकुडे, बाजीराव चिमूरकर, मधुकर राऊत, प्रवीण इटनकर, येमाजी भोपये, स्वप्नील चिमूरकर, गोविंदा चापले, सुनील चिमुरकर, विजय भोयर,भास्कर गुरनुले, दीपक मुंगूने, हेमंत गुरनुले, रेखा खरवडे, रेखा गुरनुले यासह अन्य भाकपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# सिरोंचा तालुक्यातील मादरम ग्रामपंचायतीत पाणीटाकी उभी; पण दीड वर्षांपासून थेंबही नाही!

विदर्भ केसरी । गडचिरोली


सिरोंचा :- तालुक्यातील मादरम ग्रामपंचायत हद्दीत लाखो रुपये खर्च करून उभारलेली पाणीटाकी दीड वर्षांपूर्वी पूर्ण झाली असली तरी आजपर्यंत गावकऱ्यांच्या नळातून एक थेंबही पाणी आलेले नाही. परिणामी ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असताना प्रशासनाने पाणीटाकीचे बांधकाम करून केवळ कागदोपत्री काम पूर्ण दाखवले आहे, असा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. प्रत्यक्षात पाईपलाईन जोडणी, वीजपुरवठा, मोटार बसविणे किंवा पाण्याचा स्रोत याबाबत कोणतीही ठोस व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने ही पाणीटाकी केवळ शोभेची वस्तू ठरत आहे. महिलांना आणि नागरिकांना आजही विहिरी, हँडपंप किंवा लांब अंतरावरून पाणी आणावे लागत असून उन्हाळ्याच्या तोंडावर परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. लाखो रुपयांचा निधी खर्च होऊनही जनतेला मूलभूत सुविधा मिळत नसल्यामुळे संबंधित विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, भाकपा गडचिरोली जिल्हा



सहसचिव सचिन मोटकूलावर यांच्या मार्गदर्शनाखाली भाकपा सिरोंचा तालुका सचिव रवि बारसागंडी यांनी गावात भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली व ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी तात्काळ पाणीपुरवठा सुरू करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. ग्रामस्थांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व पाणीटाकी कार्यान्वित करून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी जोरदार मागणी केली आहे. "मादरम गावातील पाणीटाकी तात्काळ सुरू करून ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल," अशी ठाम भूमिका स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# आरमोरीत अवैध दारूवर पोलिसांची धडक कारवाई : एकूण १ लाखाहून अधिक मुद्देमाल जप्त..!

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे




आरमोरी :- गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी पोलिसांनी अवैध दारूविरोधात धडक कारवाई करत दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसायावर पोलिसांनी आळा घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे.पहिल्या घटनेत, इंदिरानगर डोंगरी ते आरमोरी-गडचिरोली मुख्य मार्गावर पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचला. दरम्यान, काळ्या रंगाची पल्सर २२० एसएफ (MH-४९-८-४६६६) या वाहनावरून अवैधरित्या दारू वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी वाहन सोडून पसार झाले. घटनास्थळी तपासणी केली असता रॉयल स्टॅग कंपनीच्या १८० मि.ली. च्या ५९ बाटल्या (किंमत सुमारे १७,७०० रुपये) व वाहन (किंमत सुमारे ८०,००० रुपये) असा एकूण ९७,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरमोरी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक १०२/२०२६ अंतर्गत महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या घटनेत, वैरागड परिसरात पोलिसांनी कारवाई करत आरोपी रामकृष्ण माधवगोनी (वय ४५) याच्या ताब्यातून ४५ लिटर अवैध दारू जप्त केली. सदर दारू १५ लिटर क्षमतेच्या तीन प्लास्टिक कॅनमध्ये साठवून विक्रीसाठी ठेवण्यात आली होती. या दारूची किंमत सुमारे ४,५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी गुन्हा क्रमांक १०३/२०२६ नोंदविण्यात आला असून आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू आहे. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नरेश सहारे करीत आहेत. दरम्यान, अवैध दारूविरोधात अशा कारवाया सातत्याने सुरू राहणार असल्याचा इशारा पोलीस निरीक्षक कैलास गवते यांनी दिला आहे.

# 'दीनदयाल उपाध्याय महा प्रशिक्षण अभियान' व प्रदर्शनीचे उत्साहात!

विदर्भ केसरी । धानोरा

शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा या उद्देशाने, आज धानोरा येथील किसान भवन येथे "दीनदयाल उपाध्याय महा प्रशिक्षण अभियान २०२६" आणि भव्य प्रदर्शनीचे उद्घाटन अत्यंत उत्साहात संपन्न झाले.

प्रशिक्षणातून सक्षम होणार कार्यकर्ते

या महा प्रशिक्षण अभियानाचा मुख्य हेतू कार्यकर्त्यांना आणि सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची तांत्रिक व सविस्तर माहिती देणे हा आहे. कार्यकर्त्यांनी हे ज्ञान आत्मसात करून नागरिकांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी दुवा म्हणून काम करावे, अशी अपेक्षा याप्रसंगी व्यक्त करण्यात आली.

प्रदर्शनी ठरली आकर्षणाचे केंद्र

कार्यक्रमाच्या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनीत शासनाच्या विविध विभागांच्या योजनांची सविस्तर मांडणी करण्यात आली होती. आवश्यक कागदपत्रे. अर्ज करण्याची पद्धत आणि पात्रता. थेट लाभ हस्तांतरण (DBT) विषयी माहिती. या सर्व गोष्टींची माहिती मिळाल्याने जनतेला शासनाच्या उपक्रमांची जवळून ओळख झाली.

' अंत्योदयाचा' विचार आणि विकास

"अंत्योदयाचा विचार, सर्वांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न" हे सूत्र डोळ्यासमोर ठेवून हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या उद्घाटन सोहळ्याला स्थानिक मान्यवर, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# सेवा भाव आणिसंपर्क हेच भाजपच्या यशाचे गमक : प्रशांत वाघरे

## दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत निवासी कार्यशाळेची सुरुवात..!

विदर्भ केसरी । गडचिरोली



पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान-२०२६ अंतर्गत भारतीय जनता पार्टी कुरखेडा मंडलाच्या वतीने श्री भगवान महादेव देवस्थान, अरततोंडी (ता. कुरखेडा) येथे आयोजित दोनदिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यशाळेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यशाळेचे उद्घाटन आरमोरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार कृष्णा गजबे व माजी जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे यांच्या हस्ते महादेवाची विधिवत पूजा करून करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रशांत वाघरे बोलत होते. त्यांनी सांगितले की, भारतीय जनता पार्टीची ताकद ही तिच्या समर्पित कार्यकर्त्यांमध्ये असून, नियमित प्रशिक्षण, संघटनात्मक शिस्त आणि समाजाशी सातत्याने ठेवलेला संपर्क यामुळेच पक्ष देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे. ते पुढे म्हणाले की, प्रत्येक कार्यकत्यनि बूच पातळीपर्यंत संघटन मजबूत करण्यावर भर देत जनतेशी प्रत्यक्ष संवाद साधला पाहिजे. शासनाच्या विविध योजनांची माहिती घराघरांत पोहोचवून लाभार्थ्यांपर्यंत त्या पोहोचविणे हीच खरी पक्षसेवा आहे.

प्रशांत वाघरे यांनी अधोरेखित केले की, पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या ध्येयवाक्याच्या आधारे देशाचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. गरीब, शेतकरी, महिला आणि युवकांच्या सशक्तीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत आहे. तसेच, सत्ता ही सेवेचे साधन या तत्त्वावर काम करताना प्रत्येक कार्यकर्त्याने प्रामाणिकपणे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही त्यांनी केले. पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अंत्योदय विचारांना प्रत्यक्षात आणणे हीच भाजप कार्यकर्त्यांची खरी जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी माजी आमदार कृष्णाजी गजबे यांनीही मार्गदर्शन करताना संघटन बळकटीकरणासाठी अशा प्रशिक्षण उपक्रमांचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमास महादेव गड देवस्थानचे अध्यक्ष तथा माजी भाजपा तालुका अध्यक्ष डॉ. ते. ना. बुद्धे, भाजप तालुका अध्यक्ष चांगदेव फाये, ज्येष्ठ नेते विलास गावंडे, अल्पसंख्याक मोर्चा जिल्हाध्यक्ष बबलू हुसेनी, ओबीसी जिल्हा महामंत्री रवींद्र गोटेफोडे, नगरसेवक ॲड. उमेश वालदे, जिल्हा सचिव रूपाली गावडे, भाजपा महिला शहर अध्यक्ष कल्पना मांडवे, महामंत्री प्रा. विनोद नागपूरकर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बांगदेव फाये यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. विनोद नागपूरकर यांनी केले. या प्रशिक्षण कार्यशाळेत तालुक्यातील भाजप पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

# कम्मासुर गावाची बिकट अवस्था ; 30 र्षांपासून पुलाची मागणी प्रलंबित

## काम न झाल्यास चक्का जामचा आंदोलनचा इशारा

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे



अहेरी :- पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कम्मासुर गावाची अवस्था अत्यंत गंभीर झाली असून नागरिकांना अक्षरशः मरणयातना सहन कराव्या लागत आहेत. अहेरीपासून सुमारे 70 किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात मूलभूत सुविधांचा पूर्णपणे अभाव असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. गावात सिमेंट रस्ते नाहीत, नाल्यांची व्यवस्था नाही आणि वीजपुरवठा असूनही तो नसल्यासारखाच असल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे, देचली मुख्य रस्त्या पासून सुमारे 3 किलोमीटर अंतरावर असलेल्या कम्मासुर गावाच्या मध्यभागी एक मोठा नाला असून, त्यावर गेल्या 30 वर्षांपासून पुलाची मागणी करण्यात येत आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही शासन व प्रशासनाकडून झालेली नाही.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग, गडचिरोलीच्या अधीक्षक अभियंता ठाकरे यांना विचारणा केले असता, त्यांनी "व्ही.आर. नंबर तपासून पुढील कार्यवाही करू" असे आस्वासन देण्यात आले दरम्यान, माजी पालकमंत्र्यांना अहेरी येथे एका कार्यक्रमादरम्यान गावकऱ्यांनी आपली व्यथा मांडली असता, त्यांनीही पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे. दरम्यान, भाजपचे सदस्य तसेच जेष्ठ पत्रकार जावेद अली, महेश अलोणे, आणि युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष मधुकर गोंगले आणि सुवर्ण महाराष्ट्र न्यूजचे जिल्हा पत्रकार इन्नू पठाण यांनी प्रत्यक्ष गावात जाऊन पाहणी केली असता परिस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे स्पष्ट झाले.

**निष्कर्ष:** कम्मासुर गावातील नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित असून प्रशासन व लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष उघड होत आहे. आता तरी संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधी याकडे गांभीर्याने लक्ष देतात का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.या वेळी गावातील संपूर्ण नागरिक, महिला, पुरुष, मोठया संख्येने उपस्थित होते.

गडचिरोली
BREKING NEWS
TODAY
GOOD MORNING

दैनिक विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी
सोमवार, दि. 13 एप्रिल 2026



» Selected

## खासदार डॉ किरसान यांनी कार्यकर्त्यांच्या व जनतेच्या समस्या जाणून घेतल्या



देसाईगंज - जनसंपर्क कार्यालय, गडचिरोली येथे गडचिरोली–चिमूर लोकसभा क्षेत्राचे लोकप्रिय खासदार डॉ. नामदेवराव किरसान यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी विविध भागांतून आलेल्या कार्यकर्त्यांनी आपल्या अडचणी, स्थानिक प्रश्न व जनतेच्या समस्या मांडल्या. खासदार डॉ. किरसान यांनी सर्वांचे म्हणणे ऐकून घेत संबंधित समस्यांचे तात्काळ निवारण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन दिले. या प्रसंगी गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे, युवक काँग्रेस राष्ट्रीय सचिव ॲड. विश्वजीत कोवासे, जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव सालोटकर, प्रभाकर वासेकर, समशेर खान पठान, नगरसेवक तथा शहराध्यक्ष काँग्रेस कमिटी गडचिरोली सतीश विधाते, नगरसेवक श्रीकांत देशमुख, नगरसेविका मेघा वाटगंटीवार, देवाजी सोनटक्के, तालुकाध्यक्ष काँग्रेस कमिटी गडचिरोली वसंत राऊत, जिल्हाध्यक्ष किसान विभाग गडचिरोली वामनराव सावसाकडे, नेताजी गावतुरे, अनिल कोठारे, मुस्ताक हकीम, नदीम नाथानी, दिवाकर निसार, निजान पेंदाम, प्रतिक बारसिंगे, महिला तालुकाध्यक्ष कल्पना नंदेश्वर, ढीवरू मेश्राम, हेमंत मोहितकर, समीर ताजने, गौरव येनप्रेड्डीवार, विपुल येलटीवार, लालाजी सातपुते, संदीप भैसारे, नितीन लाडे, स्वप्नील बेहरे, विजय राऊत, जावेद खान आदी मान्यवर उपस्थित होते.

---

## कर्नाटक राजकारणात मोठा भूकंप?

नवी दिल्ली : गेल्या काही महिन्यांपासून कर्नाटकात मोठ्या राजकीय घडामोडी पाहायला मिळत आहेत. मुख्यमंत्री पदावरून काँग्रेसमधील वाद काही दिवसांपूर्वी चव्हाट्यावर आला होता.काही आमदारांनी नवी दिल्लीत जाऊन काँग्रेसच्या हायकमांडची भेट घेतली होती आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांना मुख्यमंत्री करण्याची मागणी करण्यात आल्याचं बोललं जात होतं. मात्र, काँग्रेस हायकमांडने या चर्चा फेटाळून लावल्या होत्या. त्यानंतर आता पुन्हा एकदा कर्नाटकात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. कर्नाटक सरकारमधील जवळपास ३० काँग्रेस आमदार बंडाच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. ३० आमदार एकत्र मिळून तातडीने दिल्लीला रवाना झाल्याची सांगितली जात आहे.

# योजनांच्या लाभातून प्रगती साधा; आ. नरोटे

## धानोरा येथे शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात

विदर्भ केसरी । धानोरा



शासकीय योजनांचा थेट लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हा प्रशासनाचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांनी जागरूक राहून या योजनांचा लाभ घ्यावा आणि स्वतःचा विकास साधावा," असे प्रतिपादन गडचिरोलीचे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी केले. धानोरा तहसील कार्यालयाच्या आवारात आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'त ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेत पांदण रस्त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे सांगत डॉ. नरोटे यांनी या प्रश्नावर प्रशासनाला कडक निर्देश दिले. जिल्हा वार्षिक निधीतून (DPC) स्वतंत्र तरतूद करून पांदण रस्त्यांची कामे मार्गी लावण्यासाठी समिती गठित करण्यात आली आहे. "पांदण रस्त्यांवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाहीत. तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि पटवाऱ्यांनी तत्काळ ही अतिक्रमणे हटवावीत; जे यात अडथळा आणतील त्यांच्यावर कठोर कारवाई करा," असा इशाराही त्यांनी दिला.

शेतमजुरांना दिलासा, जमीन महसुलात सवलत यावेळी त्यांनी सरकारच्या महत्त्वाच्या निर्णयांची माहिती दिली. 'स्वर्गीय गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजने'ची व्याप्ती वाढवून आता त्यात भूमिहीन शेतमजुरांचाही समावेश करण्यात आला आहे. तसेच वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यासाठी लागणारे जादा शुल्क कमी केल्यामुळे सर्वसामान्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

प्रशासकीय दिरंगाईवर ओढले ताशेरे धानोरा तालुक्यातील वनहक्क दावे आणि सातबारा संदर्भातील प्रलंबित प्रकरणांवर त्यांनी चिंता व्यक्त केली. महसूल विभागाने या संवेदनशील प्रश्नांवर अधिक वेगाने काम करणे अपेक्षित आहे, असे सांगत त्यांनी जनतेच्या कामात दिरंगाई करणाऱ्यांना इशारा दिला. तसेच, शिबिराच्या ठिकाणी नियोजनाचा अभाव दिसल्यास किंवा नागरिकांच्या बसण्याच्या व्यवस्थेत त्रुटी आढळल्यास संबंधितांची गय केली जाणार नाही, असेही त्यांनी ठणकावून सांगितले. याप्रसंगी ना. तहसीलदार देवेंद्र वाळके, उपअधीक्षक भूमी अभिलेख नंदताई आंबेकर,मंडळ अधिकारी दर्शना कुळमेथे ,भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव रमेश भुरसे, तालुकाध्यक्ष साजनभाऊ गुंडावार, उपाध्यक्ष अनिल पोहनकर, जिल्हा सचिव सारंग साळवे, कोषाध्यक्ष सुभाष खोबरे,युवा नेते अविनाश पोरेटी, राकेश दास यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कैमुल येथे समस्या निवारणासाठी चर्चा सत्र; आमदार रामदास मसराम यांची उपस्थिती

विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम



देसाईगंज - दि. १२ एप्रिल २०२६ रोजी कोरची तालुक्यातील कैमुल येथे विविध स्थानिक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राला आमदार श्री रामदासजी मसराम यांनी उपस्थित राहून नागरिकांशी थेट संवाद साधला. यावेळी कैमुल परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य व इतर मूलभूत सुविधांशी संबंधित अनेक समस्या नागरिकांनी आमदार रामदास मसराम यांनी निदर्शनास आणून दिल्या. गावकऱ्यांच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदनही आमदार श्री रामदासजी मसराम यांना सादर करण्यात आले. आमदार मसराम यांनी सर्व समस्या लक्षपूर्वक ऐकून घेत संबंधित विभागांमार्फत तात्काळ पाठपुरावा करून समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन दिले. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाला सूचना देण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले- डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव उत्साहात सुरू!

विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम



देसाईगंज - देसाईगंज तालुक्यातील कोंढाळा येथे बौद्ध समाज, आम्रपाली बौद्ध महिला मंडळ, प्रशिक क्रीडा मंडळ, युवा मंच तसेच समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवाला ११ एप्रिल पासून उत्साहात सुरुवात झाली. दि. ११ एप्रिल २०२६ रोजी समाज प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार श्री रामदासजी मसराम यांच्या हस्ते पार पडले. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत सामाजिक ऐक्य व शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी महाराष्ट्राची सुप्रसिद्ध गायिका दीदी अंजली भारती यांनी आपल्या सुमधुर गीतांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. महोत्सव १४ एप्रिलपर्यंत विविध उपक्रमांनी साजरा केला जाणार आहे.

त्या प्रसंगी उपस्थित काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष महेंद्रभाऊ ब्राह्मणवाडे, माजी सभापती परसरामजी टिकले, माजी उपसभापती नितीन राऊत, काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष आरमोरी मिलिंद खोब्रागडे, नगरसेवक तथा गटनेता विकास प्रधान, नगरसेवक राजूभाऊ रासेकर ,धनपाल मिसार सर, सरपंच अर्पणा राऊत, उपसरपंच गजानन सेलोटे, नगरसेवक पिंकू बावणे, नितीन मोहुर्ले, अरुण कुंभरवार, संदीप वाघाडे, कैलास वानखेडे, सागर बन्सोड, विजय पिल्लेवान उपस्थित होते.

## धान खरेदीचे उद्दिष्ट तात्काळ वाढवा, भाकप चे जिल्हाधिकारी यांना निवेदन

### बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन!अन्यथा तीव्र आंदोलन

विदर्भ केसरी । अहेरी




देसाईगंज : ब्रह्मपुरी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या धानाची विक्री होऊनही केवळ 'उद्दिष्ट' संपल्याच्या तांत्रिक कारणामुळे चुकारे रखडले आहेत. हा अन्नदात्याचा छळ असून, येत्या आठवडाभरात धान खरेदीची मर्यादा वाढवून न दिल्यास भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा लढाऊ शेतकरी नेते कॉ. विनोद झोडगे यांनी दिला आहे. गुरुवार, ९ एप्रिल २०२६ रोजी ब्रम्हपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देऊन जिल्हाधिकारी मा. वसुमना पंत यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

खरेदी होऊनही 'बिलिंग' ठप्प: तालुक्यातील मुडझा, आवळगाव, हळदा, वांद्रा, बरडकिन्ही आणि गांगलवाडी परिसरातील सेवा सहकारी संस्थांच्या केंद्रांवर शेतकऱ्यांनी धान विक्री केली आहे. मात्र, शासनाचे उद्दिष्ट संपल्यामुळे गेल्या ३-४ महिन्यांपासून या धानाची ऑनलाईन 'बिलिंग' झालेली नाही.

कर्जाचा डोंगर आणि बँकांचा तगादा: धानाचे चुकारे वेळेवर मिळतील या आशेवर शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतले होते. मात्र, पैसे न मिळाल्याने कर्जाची परतफेड रखडली असून शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

प्रशासनाशी थेट चर्चा: कॉ. विनोद झोडगे यांनी निवेदन सादर करतानाच जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केली आणि तालुक्यातील विदारक स्थिती मांडून तातडीने मर्यादा वाढवण्याची मागणी केली, तेव्हा लवकरच कलेक्टर ऑफिसला बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे.

शेतकरी नेत्यांचा आक्रमक पवित्रा: जर ७ दिवसांच्या आत शासनाने सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर भाकपच्या वतीने शेतकरी रस्त्यावर उतरून आपल्या हक्काचा लढा लढतील, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ रवींद्र उमाटे,सहसचिव कॉ.राजू गयनेवार ,किसान सभा जिल्हा अध्यक्ष कॉ.प्रा.नामदेव कनाके, शशिकांत वार्जुकर,महेश दूमाने, खेमराज उरकूडे,संकेत चौधरी यांच्यासह तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

## भाजप महिला आघाडी जिल्हा गडचिरोलीच्या वतीने आयोजित "दिवार स्वाक्षरी" मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे



गडचिरोली :- लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या ऐतिहासिक नारीशक्ती वंदन विधेयकाला समर्थन देण्यासाठी भारतीय जनता पार्टी महिला आघाडी जिल्हा गडचिरोलीच्या वतीने आज दिवार साक्षरी मोहिमेचे आयोजन मा.आमदार डॉ. मिलिंदजी नरोटे यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये करण्यात आले होते. सनातन संस्थेच्या संचालिका मा. लताताई समर्थ यांच्या स्वाक्षरीने "दिवार स्वाक्षरी" मोहिमेला सुरुवात करण्यात आली. दिवार स्वाक्षरी मोहिमेला मा.आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार, मा.आमदार परिणयजी फुके, माजी खासदार अशोकजी नेते,आमदार डॉ.मिलिंदजी नरोटे, आदिवासी मोर्चा प्रदेशाध्यक्ष माजी आमदार डॉ. देवरावजी होळी, भाजपा जिल्हा अध्यक्ष प्रा. रमेशजी बारसागडे, माजी आमदार कृष्णाजी गजबे, ज्येष्ठ नेते बाबुराव कोहळे, इंजि. प्रमोदजी पिपरे संचालक महाराष्ट्र सहकारी संघ मर्या. पुणे, महामंत्री प्रकाशजी गेडाम महामंत्री, सदानंदजी कुथे, गोविंदजी सारडा महामंत्री मा. योगिताताई पिपरे, भाजपा महिला आघाडी जिल्हाध्यक्ष (माजी नगराध्यक्ष) तथा नगरसेविका गडचिरोली, सपनाताई मुनगंटीवार, रेखाताई डोळस, प्रणोतीताई निंबोळकर नगराध्यक्ष नप गडचिरोली, अनिलजि कुणघाडकर शहराध्यक्ष, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मधुकरजी भांडेकर, योगिताताई भांडेकर माजी अध्यक्ष जी.प. गडचिरोली, सीमाताई कन्नमवार महिला आघाडी गडचिरोली शहर अध्यक्ष, वर्षाताई शेडमाके जिल्हा सचिव, प्रतिभाताई चौधरी, डॉ. भारत खटी हर्षल गेडाम सभापती नप गडचिरोली, देवाजी लाटकर, प्रा. अरुण उराडे, शेखर आखाडे, अलकाताई पोहनकर माजी नगरसेविका, अर्चनाताई निंबोळ नगरसेविका, शिल्पाताई हेमके नगरसेविका, गुड्डी ताई मारबते नगरसेविका, साक्षीताई बोलूवार नगरसेविका, कविताताई उरकुडे माजी शहर अध्यक्ष ध्रुपताताइ खेडेकर तसेच भाजपा महिला पदाधिकारी, कार्यकर्ता आणि सर्वसामान्य नागरिकांनी स्वाक्षरी करून या मोहिमेला उस्फूर्त प्रतिसाद दिला. पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली महिलांना राजकारणात समान संधी मिळावी या उद्देशाने हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. स्वाक्षरी मोहिमेद्वारे या विधेयकाला समर्थन देण्यात येत असून महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी हे विधेयक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात भाजपा महिला आघाडीच्या जिल्हा पदाधिकारी, कार्यकर्त्या तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहभागी महिलांनी या विधेयकाचे स्वागत करत महिलांच्या सशक्तीकरणाच्या दिशेने हे एक ऐतिहासिक पाऊल असल्याचे नमूद केले. "दिवार स्वाक्षरी" मोहीम कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मा. योगिताताई पिपरे जिल्हाध्यक्ष भाजपा महिला आघाडी तसेच महिला आघाडी पदाधिकारी यांनी सहकार्य केले.

## नाशिक प्रकरणातील माहिती तंत्रज्ञान कंपनीचा दणका!

### नाशिकमधील कार्यालयातील अनेक धक्कादायक गोष्टी समोर

विदर्भ केसरी । मुंबई



माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीच्या नाशिकमधील कार्यालयातील अनेक धक्कादायक गोष्टी समोर येत आहेत. असे असताना माहिती तंत्रज्ञान कंपनीने या प्रकरणी खुलासा करीत संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई केल्याचे जाहीर केले आहे. या प्रकरणाच्या चौकशीत तपास यंत्रणांना सर्वतोपरी सहकार्य केले जात असल्याचेही कंपनीने स्पष्ट केले आहे. माहिती तंत्रज्ञान कंपनीने म्हटले आहे की, अत्याचार आणि इतर गैरप्रकाराचे प्रकरण कंपनी थारा देत नाही. आम्ही कर्मचाऱ्यांची सुरक्षा आणि कल्याणाला नेहमीच प्राधान्य देतो. यासाठीची उच्च मानके आम्ही स्वीकारलेली असून, त्यांचे पालन केले जाते. कर्मचाऱ्यांच्या छळाच्या घटनांना व्यवस्थापन सहन करणार नाही. नाशिकमधील प्रकरणात चौकशी सुरू असलेल्या कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नाशिकमधील प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर आम्ही तातडीने ही कारवाई केली आहे. या प्रकरणी चौकशी सुरू असलेल्या कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. याचबरोबर चौकशीत तपास यंत्रणांना सर्वतोपरी सहकार्य केले जात आहे.कंपनीत कार्यरत सहकारी कर्मचाऱ्यांकडून महिलांचा विनयभंग, लैंगिक व मानसिक अत्याचार, धार्मिक भावना दुखावणे आणि धर्मांतराचा प्रयत्न आदी प्रकार घडल्याचे समोर आले आहे. महिला लैंगिक शोषणाची तक्रार आल्यानंतर पोलिसांनी सखोल तपास केला असता धक्कादायक बाबी समोर आल्या. लैंगिकदृष्ट्या जवळीक साधण्यासाठी लज्जास्पद वर्तन, पीडितांना स्पर्श करणे, वैवाहिक आयुष्याविषयी, वैयक्तिक आयुष्यात संतती नसल्याबाबत बोलणे, बळजबरीने मांसाहार सेवन करायला लावणे, शरीरावरून अश्लील शेरेबाजी यासह एका युवकाच्या धर्मांतराचा प्रयत्न आदी तक्रारींवरून आतापर्यंत नऊ गुन्हे दाखल झाले आहेत.या प्रकरणानंतर कंपन्यांतील महिला कर्मचाऱ्यांच्या अत्याचाराच्या प्रकरणांची चर्चा सुरू झाली आहे. अनेक कंपन्यांमध्ये महिलांवरील अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी अंतर्गत समित्या स्थापन नसल्याचे समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर कामगार आयुक्तालयाने कंपन्यांची तपासणी मोहीम हाती घेणार आहे.

## NSUI तर्फे माता मंदिर येथे आरोग्य शिबिर

विदर्भ केसरी । देसाईगंज




११ एप्रिल २०२६ रोजी महाराष्ट्र प्रदेश महासचिव निशांत मनोज वनमाळी यांच्या मार्गदर्शनाखाली NSUI देसाईगंज द्वारा आयोजित NSUI स्थापना दिनानिमित्त माता मंदिर, देसाईगंज येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. मा आमदार श्री. रामदासजी मसराम यांच्या हस्ते उद्घाटन झाले. शिबिरात नागरिकांची मोफत तपासणी, औषधोपचार व तज्ज्ञ मार्गदर्शन करण्यात आले. जवळपास २०० नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. समाजातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात विविध आजारांवर मोफत तपासणी, औषधोपचार तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः ग्रामीण व वंचित घटकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्याचा NSUI चा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून शिबिराचा लाभ घेतला. तसेच NSUI तालुका देसाईगंजचे पदाधिकारी वैभव गोलाईत, निशिकांत वाढई, ओंकार कामथे तसेच देसाईगंज मधील इतर पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी काँग्रेस कमिटी तालुका अध्यक्ष राजेंद्र बुल्ले, माजी उपसभापती नितीन राऊत, नगरसेवक तथा गटनेता विकास प्रधान, नगरसेविका आशाताई दहिवले, गुरमीतकौर चावला, मंदा समर्थ, विक्की रामाणी, ओबीसी सेल तालुकाध्यक्ष कैलाश वानखेडे, आरमोरी विधानसभा अध्यक्ष कमलेश बारस्कर, प्रकाश समर्थ, आनंदसिंग चावला, युवा नेते प्रशांत अंकमवार, वैष्णवीताई आकरे, सुधाकर राऊत, सागर बनसोड, तसेच NSUI आरमोरी तालुकाध्यक्ष पवन भोयर आदी मान्यवर उपस्थित होते.